




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक ६२ * नांदेड * शनिवार, दि. ७ मार्च २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


# राज्यातील शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा; ७ लाख ६९ हजार ४६७ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**मुंबई (प्रतिनिधी)–** विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना महायुती सरकारने दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष पूर्तता करताना, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली. त्यासोबतच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम ठेवताना, त्यासाठी भरीव तरतूद करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. यंदाच्या अर्थसंकल्पाचे आकारमान तब्बल ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी इतके आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ साठीचा अर्थसंकल्प जाहीर केला. विधान परिषदेत अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी राज्याचा अर्थसंकल्प मांडला. मुख्यमंत्री म्हणाले, आम्ही निवडणुकीत केलेल्या घोषणेनुसार, राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' मी जाहीर करीत आहे. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीककर्ज थकित असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाईल. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपये अनुदानही दिले जाईल.

कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर लाभ देण्यासोबतच बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी, तसेच शेतकऱ्यांना कायमस्वरुपी कर्जमुक्त करण्यासाठी समितीच्या शिफारसींनुसार कार्यवाही करणार आहोत, असेही त्यांनी सांगितले. आमच्या सरकारने जून ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत शेतकऱ्यांना १५ हजार ४९२ कोटी रुपये वितरित केले. आता शेतीमालाला जागतिक बाजारपेठ देण्यासाठी १० ते १५ पिकांची एकात्मिक मूल्यसाखळी निर्माण करणार आहोत, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. ॲग्रीस्टॅक, महावेध, क्रॉपसॅप, महाडीबीटी, को. ऑप स्टॅक इत्यादी डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून एकात्मिक इकोसिस्टीम उभारणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे मुख्यमंत्री म्हणाले, शेतीत एआयचा वापर सुरू करण्यात आला आहे. महाविस्तार एआय, वसुधा व्हॉईस टेलिफोनी, पुश टेलिफोनी, महाराष्ट्र ॲग्रीकल्चर डेटा एक्सचेंज, एआय सक्षम सँडबॉक्स इत्यादी उपक्रम सुरू करण्यात आले आहे. यापुढे ४ कृषी विद्यापीठांमध्ये एआय क्षमता आणि कृषी स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी आर्टिफिशियल इंटिलिजन्स इनोव्हेशन अँड इन्क्युबेटर सेंटरची स्थापना करणार आहोत. जेणेकरून उत्पादन खर्चात २५ टक्के घट होऊन उत्पादकता वाढीला चालना मिळेल.

जानेवारी २०२६ पर्यंत १ कोटी ३१ लाख फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. आता त्यात आदिवासी वनपट्टेधारक शेतकरी समाविष्ट करणार आहोत. कृषी समृद्धी योजनेंतर्गत २०२६-२७ पासून ४ वर्षांत भांडवली गुंतवणूक वाढवली जाणार आहे. त्याशिवाय नवीन प्राकृतिक शेती अभियानांतर्गत ५ लाख हेक्टर क्षेत्र प्राकृतिक शेतीखाली आणण्याचे उद्दिष्ट असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, लाडकी बहीण योजना बंद करणार, अशा वावड्या निवडणुकीत आणि त्यानंतरही उठण्यात आल्या. मात्र, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कायम राहणार असून, या अर्थसंकल्पात त्यात भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय सर्व जिल्ह्यांत एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून, या अहवालाचे विश्लेषण करून एकल महिलांसाठी विशेष धोरण आणले जाणार आहे.

राज्यात आतापर्यंत २७ लाख लखपती दिदी झाल्या. २०२६-२७ मध्ये आणखी २५ लाख लखपती दिदी करणार आहोत. त्याव्यतिरिक्त महिला बचतगटांच्या वस्तू उत्पादन, विक्रीसाठी १३ जिल्ह्यांत उमेद मॉल उभारले जाणार आहेत. अंगणवाडी सेविकांना आर्थिक नियोजनाबाबत प्रशिक्षण, योजनेतील लाभार्थ्यांना आर्थिक साक्षर करुन लाभाचे व्यवस्थापन, गुंतवणुकीचे मार्गदर्शन करणार आहोत, असेही ते म्हणाले.

### राज्याचा अर्थसंकल्प शेतकऱ्यांच्या हिताचा –खा.अशोकराव चव्हाण

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सादर केलेला अर्थसंकल्प हा जनतेच्या अपेक्षा पूर्ण करणारा आणि महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला गती देणारा आहे. विशेषतः शेतकऱ्यांसाठी दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीची घोषणा करून राज्यातील शेतकरी बांधवांना मोठा दिलासा देण्याचा संवेदनशील निर्णय सरकारने घेतला आहे. या अर्थसंकल्पात विकासाच्या विविध योजना मांडताना मुख्यमंत्र्यांनी माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा उल्लेख करत त्यांच्या स्मारकाबाबतची भावना व्यक्त केली आणि त्यांच्या अनुपस्थितीची जाणीवही सभागृहासमोर मांडली, ही अत्यंत भावनिक व संवेदनशील बाब आहे, अशी प्रतिक्रिया राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी दिली आहे.

### शेतकऱ्यांचे ऋण फेडणारा अर्थसंकल्प –आ. आनंद पाटील बोंढारकर

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने जो जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. त्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित करण्यात आला होता. त्या आश्वासनाची पूर्तता राज्य सरकारने केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांची कर्जमाफी देण्यात आली आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प शेतकऱ्यांचे आणि मातीचे ऋण फेडणारा अर्थसंकल्प आहे, अशी प्रतिक्रिया नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी दिली आहे.

### 'उर्जा'वान महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने 'मार्ग'क्रमण –आ. श्रीजया चव्हाण

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या यंदाच्या अर्थसंकल्पात उर्जा विभागासाठी सर्वाधिक २७ हजार ९६३ कोटी रुपये तर त्याखालोखाल सार्वजनिक बांधकाम विभागासाठी २६ हजार २१८ कोटी रुपयांचा नियत व्यय प्रस्तावित केल्याचा धागा धरून भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजपा आमदार श्रीजया चव्हाण यांनी हा अर्थसंकल्प म्हणजे 'उर्जा'वान महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने 'मार्ग'क्रमण असल्याचे म्हटले आहे.

### महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेणारा अर्थसंकल्प –चैतन्यबापू देशमुख

विकास, सामाजिक बांधिलकी आणि राज्याच्या भविष्यासाठीची दूरदृष्टी यांचा संगम असलेला हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला प्रगतीच्या नव्या उंचीवर नेणारा ठरेल, असा मला ठाम विश्वास आहे, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. चैतन्यबापू देशमुख यांनी व्यक्त केली.

## कृषी उत्पन्न बाजार समिती मैदानावर १५ व १६ मार्चला जिल्हा कृषी व धान्य महोत्सव

### १०० स्टॉलची होणार उभारणी

### शेतकरी-ग्राहकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)–** कृषि विभाग व आत्मा, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा कृषी व धान्य महोत्सव २०२६ चे आयोजन १५ ते १६ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात आले आहे. हा महोत्सव सकाळी १० ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत कृषि उत्पन्न बाजार समिती मैदान, नवा मोंढा, नांदेड येथे होणार आहे.

हा महोत्सव नांदेड शहरवासीयांसाठी एक प्रकारची मेजवानी असून नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शेतमालाची खरेदी करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

या कृषी महोत्सवात कृषी प्रदर्शन, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विद्यापीठांचे स्टॉल, विविध कृषी तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक तसेच कृषी संलग्न शासकीय विभागांचे स्टॉल असे एकूण १०० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. तसेच विविध विषयांवर शेतकरी-शास्त्रज्ञ परिसंवाद, चर्चासत्र, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषी मालाचे प्रदर्शन आणि खरेदीदार-विक्रेता संमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

या महोत्सवात जिल्ह्यातील शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाच्या महिला बचतगटांचा सक्रिय सहभाग राहणार आहे. महोत्सवात शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला गहू, ज्वारी, तांदूळ, तूर, मुग, उडीद, चनाडाळ, हळद, मिरची, मसाले तसेच सेंद्रीय उत्पादने (गूळ, हळद पावडर, सेंद्रीय डाळी) विक्रीसाठी उपलब्ध असतील.

याशिवाय मध, गुळाचा पाक, चटणी, लोणचे, पापड, कुरडई, टरबूज, खरबूज, विविध फळे व भाजीपाला यांची थेट विक्री होणार आहे. तसेच जात्यावर दळलेली सेंद्रीय डाळ, गोदाकाठची ज्वारी, सेंद्रीय भाज्या, रानफळे, लाकडी घाण्यावर तयार केलेले करडई, भुईमूग, जवस व तीळाचे तेल, बांबूपासून तयार वस्तू, केळीचे वेफर्स यांचे प्रदर्शन व विक्रीही करण्यात येणार आहे.

या महोत्सवाला शहर व जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक (आत्मा) दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

## अमेरिका-इस्त्रायल आणि इराण आतापर्यंत १४०० जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज सातवा दिवस आहे. दोन्ही बाजूंनी हल्ले सुरू असून सध्या पश्चिम आशियात परिस्थिती तणावपूर्ण आहे. युद्धात इराणमध्ये सर्वाधिक जीवितहानी झाली असून आतापर्यंत १४०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे.

इराण हा जगातील प्रमुख तेल उत्पादक देशांपैकी एक आहे. युद्ध अधिक भडकल्यास, पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. याचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतीवर होऊन, त्यात मोठ्या प्रमाणावर वाढ होऊ शकते आणि याचाच परिणाम आता भारतामध्ये जाणवू लागला आहे. इराण, अमेरिका, इस्रायल युद्धाच्या झळा आता भारतापर्यंत पोहोचल्या आहेत.

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचं आश्वासन कुठं गेलं? अर्थसंकल्पावर उद्धव ठाकरेंची टीका

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पावर उद्धव ठाकरे यांनी तीव्र टीका केली आहे. निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत त्यांनी सध्याच्या सरकारवर शेतकरी, सामान्य नागरिक आणि राज्याच्या आर्थिक व्यवस्थेबाबत दिशाभूल केल्याचा आरोप केला. निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र सादर झालेल्या अर्थसंकल्पात या आश्वासनाबाबत कोणतीही ठोस घोषणा केली नाही. उलट कर्जमाफीसाठी अनेक अटी आणि नियम लावण्यात आल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केली.



उद्धव ठाकरे म्हणाले की, पाच वर्षांपूर्वी आमच्या सरकारने कालबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांची दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी केली होती. त्या वेळी कोणत्याही अटी किंवा नियम लावले नव्हते. तसेच कोरोना काळात नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. मात्र सध्याच्या सरकारने कर्जमाफी करताना अनेक अटी लावल्या.

## अजितदादांच्या विमान अपघातानंतर बारामतीसह लातूर, अमरावती विमानतळांसाठी तरतूद

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. बारामती विमानतळावर लँड होत असताना विमान कोसळलं आणि अजित पवारांसह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. यानंतर चौकशी अहवालात बारामती विमानतळाबाबत विविध त्रुटी आढळून आल्या होत्या. याच बारामती विमानतळासह लातूर आणि अमरावती विमानतळासाठी देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्पात मोठी घोषणा केली आहे. लातूर, बारामती आणि अमरावती विमानतळावर रात्रीच्या उड्डाणांसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

### अजितदादांचं स्मारक बांधणार


माझं अंतःकरण जड झालं आहे. अजितदादा यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्या करड्या स्वभावामुळे शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणुन त्यांच भव्य स्मारक उभारलं जाईल. नागरी पुरस्कार त्यांच्या नावाने सुरु केला जाईल. हा अर्थसंकल्प त्यांना सादर करतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच अजित पवार आज आपल्यात नाहीत त्याच्या जाण्यामुळे त्यांची पोकळी भरून निघू शकत नाही. काम करणारा माणूस अशी त्यांची ओळख होती. लवकरच अजितदादांचं स्मारक बनवण्यात येईल, अशी माहितीही देवेंद्र फडणवीसांनी यावेळी दिली.

## इराण-इस्रायल युद्धाचा भडका, राज्यातील इंडस्ट्रीसाठी गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद

**मुंबई (प्रतिनिधी)–** इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर त्याच्या झळा आता भारतातही जाणवू लागल्या आहेत. संभाव्य गॅस तुटवड्याचा विचार करून राज्य सरकारने गॅसचा वापर कमीत कमी करण्यावर भर देत उद्योगांसाठी लागणाऱ्या ४७ किलो आणि ४५० किलो क्षमतेच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा तात्पुरता थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. घरगुती वापराचा गॅस पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी ही खबरदारी घेण्यात आली असून व्यावसायिक वापराच्या सिलेंडरच्या नव्या ऑर्डर घेऊ नयेत, अशा सूचना डीलर्सना देण्यात आल्या आल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील बीपीसीएलच्या शिक्रापूर प्लांट आणि एचपीसीएलच्या चाकण प्लांट येथून देखील डीलर्सना सूचना देण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. प्लांट प्रशासनाने डीलर्सना व्यावसायिक गॅस सिलेंडरसाठी गाड्या पाठवू नयेत, तसेच नव्या ऑर्डर स्वीकारू नयेत, असे निर्देश दिले आहेत. व्यवसायिक वापरासाठी उपलब्ध असणारे ५, १९, ३५, ४७ आणि ४२७ किलो क्षमतेचे सिलेंडर सध्या पुरवठ्यासाठी थांबवण्यात आले आहेत. यामुळे हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट्स तसेच विविध उद्योगांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पुढील दोन दिवसांत व्यावसायिक गॅसचा पुरवठा पूर्णपणे बंद होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे.

व्यावसायिक गॅस सिलेंडरचा वापर प्रामुख्याने हॉटेल्स, रेस्टॉरंट्स आणि औद्योगिक क्षेत्रात केला जातो. धातू वितळवणे, पावडर कोटिंग, विविध उत्पादन प्रक्रिया अशा अनेक कामांसाठी हा गॅस अत्यावश्यक असतो. त्यामुळे पुरवठा थांबल्यास उद्योग आणि हॉटेल व्यवसायावर त्याचा मोठा परिणाम होऊ शकतो. सध्या उपलब्ध असलेला मर्यादित साठाच व्यावसायिकांना वितरित केला जाणार असून त्यानंतर नवीन पुरवठा बंद राहण्याची शक्यता आहे.



## शरद पवार मविआचे उमेदवार झाल्याने दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा शेवटचा प्रयत्न अपयशी

**मुंबई (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या विलिनीकरणाबाबत राष्ट्रवादीच्या मोठ्या नेत्यानं मोठा गौप्यस्फोट केला आहे. राज्यसभेचा अर्ज भरण्याच्या सात दिवस आधी सुद्धा दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा शेवटचा प्रयत्न करण्यात आला होता. मविआकडून शरद पवार यांना उमेदवारी दिली गेली आणि राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा शेवटचा प्रयत्नही अपयशी ठरला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी महाविकास आघाडीच्या पाठिंब्यावर राज्यसभेचा अर्ज दाखल केला. भाजपनं चार, शिवसेनेनं एक, राष्ट्रवादीनं एक आणि मविआनं एक उमेदवार दिल्यानं राज्यसभा निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एकीकडे राज्यसभा निवडणुकीची धामधूम सुरु असतानाच दुसरीकडे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाचा शेवटचा प्रयत्न झाल्याची माहिती राष्ट्रवादीच्या मोठ्या नेत्यानं केली आहे.

शरद पवार यांना संयुक्त राष्ट्रवादीकडून राज्यसभेची ६ वर्षांची टर्म दिली जावी.तर पार्थ पवार यांना सुनेत्रा पवार यांच्या रिक्त होणाऱ्या जागेवर उमेदवारी दिली जावी, असा प्रस्ताव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांना देण्यात आला होता. मात्र, राष्ट्रवादी पक्षाकडून यावर कोणतेच उत्तर न आल्याने अखेर शरदचंद्र पवार पक्षाने मविआकडून उमेदवारी घेत अर्ज भरला आणि आता ही निवडणूक बिनविरोध होत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टीकडून मविआतर्फे म्हणजेच पक्षाच्यावतीनं एक आणि अपक्ष म्हणून एक असा अर्ज शरद पवारांनी दाखल केला आहे. महाविकास आघाडीच्या इतर घटकपक्षांनी देखील शरद पवारांच्या राष्ट्रवादीची भूमिका स्पष्ट झाल्यानंतर पाठिंब्याबाबत निर्णय घेतला. अखेर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेसकडून राज्यसभेसाठी मविआकडून शरद पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.

## शहरात विनापरवाना चालणाऱ्या वाहनांविरुद्ध वाहतूक शाखेकडून धरपकड मोहीम; २०६ वाहनांवर कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील शहर वाहतूक शाखेने अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने व इतर यांच्यावर धडक कारवाई करत २०६ वाहनांविरुध्द गुन्हे दाखल केले आहे.



दि. ५ मार्च रोजी सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन रेल्वे स्टेशन रोड, महावीर चौक, कलामंदीर, वर्कशॉप, राजकॉर्नर व छत्रपती चौक या ठिकाणी वाहनांची कागदपत्रे तपासणी केली. सोबतच ऑटो चालकांना गणवेश परिधान करण्याबाबत सुचना दिल्या. वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर, ट्रिपल सीट वाहने, परवाना नसलेले वाहने व इतर यांच्यावर कारवाई करुन २०६ केसेस करण्यात आल्या आहेत.

वाढत असलेल्या ट्राफिकमुळे लोकांनी त्यांची चार चाकी/दोन चाकी वाहने कुठेही पार्क न करता पार्कींगच्या ठिकाणी पार्क करावे, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल या प्रकारे कोणतेही फळ गाडे व इतर असे रस्त्यामध्ये लाऊन अतिक्रमण करू नये, सिंग्नलचे पालन करावे व वाहतुकीस अडथळा होईल अशी कोणतीही कृती करू नये व पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. अन्यथा मोटार वाहन कायदा व इतर कायद्यान्वये कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा पोलीस प्रशासनाच्यावतीने देण्यात आला आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

## सांस्कृतिक, सामाजिक आक्रमण कसे थोपविणार?

राज्याच्या मंत्रिमंडळाने महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६ पारित केला आहे. पुढे विधानसभेमध्ये याला मंजुरी मिळाल्यानंतर ते राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येईल. या कायद्यामध्ये बळजबरीने किंवा आमिष दाखवून धर्मांतर करणाऱ्यांना सात लाख रुपयांचा दंड आणि सात वर्षाची कारावासाची शिक्षा दिली जाऊ शकते. याचे कारण म्हणजे आजच्या काळात समाजजीवनात काही बदल अतिशय वेगाने घडताना दिसत आहेत. असे बदल घडवून आणले जात आहेत. त्यासाठी सर्व प्रकारच्या समाज माध्यमांचा, दबाव तंत्राचा वापर केला जात असल्याचा आरोप होत असतो. 'शिलम् परम भूषणम्' हे फक्त पुस्तकातच शिल्लक राहिले आहे. प्रत्यक्षात मात्र हे नष्ट करण्याचा नियोजनबद्ध प्रयत्न होतो आहे. यासाठी शाळा व महाविद्यालयातील मुली तसेच विवाहित सुंदर महिलांना लक्ष्य केले जात असल्याचे सांगितले जाते. हे बदल वरकरणी प्रगतीचे, समतेचे आणि सामाजिक न्यायाचे वाटतात; परंतु त्यांच्या पाठी-मागील प्रवाह नेमका कोणत्या दिशेने जात आहे, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. कारण सध्या ऐकू येत असलेला हा बदलाचा नाद काही साधा नाही, तो अपायघंटेचा इशारा तर नाही ना, याचे चिंतन करणे आवश्यक ठरते. सामाजिक न्याय, लिंगसमता, जातिभेद निर्मूलन, अन्यायाविरुद्ध लढा अशा संकल्पना कोणत्याही सुसंस्कृत समाजासाठी नाकारण्यासारख्या नाहीत. उलट त्या प्रत्येक लोकशाही व्यवस्थेचा पाया असतात. मात्र या संकल्पनांच्या आडून जर एखादा विशिष्ट विचारप्रवाह समाजाच्या मुळावर घाव घालत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. 'प्रगतिपर' म्हणून मिरवला जाणारा हा विचार आज सर्व क्षेत्रांत प्रभावी होताना दिसतो आहे. पूर्वीचे आक्रमण उघड आणि प्रत्यक्ष स्वरूपाचे असायचे. युद्धे, सीमावाद, लष्करी हल्ले यांना प्रतिकार करण्यासाठी सेना आणि शक्ती वापरता येत असे. शत्रू दिसत असे आणि त्याचा मुकाबला करता येत असे. पण आजचे आक्रमण वेगळ्या स्वरूपाचे आहे. ते सांस्कृतिक आहे, मानसिक आहे आणि बौद्धिक आहे. ते थेट दिसत नाही; त्याची जाणीव होईपर्यंत बरेच काही बदलून गेलेले असते. आक्रमणच कळले नाही, तर त्याचा प्रतिकार कसा करणार? या नव्या प्रकारच्या आक्रमणाचे विशेष म्हणजे ते सुंदर शब्दांच्या आवरणात येते. 'समाजाचा उद्धार', 'वंचितांचे सक्षमीकरण', 'असमानतेचे निर्मूलन', 'अन्यायाचा अंत', अशा आकर्षक घोषणांमुळे हे विचार झपाट्याने लोकप्रिय होतात. थोड्याच काळात ते जनमानसात घर करतात. परंतु या घोषणांच्या आडून समाजातील परंपरागत मूल्यांवर, श्रद्धांवर आणि संस्थांवर सतत प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे का, याची छाननी करणे आवश्यक असल्याची मागणी सातत्याने होत होती. भारतीय समाजाचा पाया हा सांस्कृतिक आणि कौटुंबिक मूल्यांवर उभा आहे. कुटुंब ही केवळ सामाजिक संस्था नाही, तर ती संस्कारांची पहिली शाळा आहे. धर्म, परंपरा, इतिहास आणि स्थानिक जीवनपद्धती यांनी या समाजाला ओळख दिली आहे. परंतु अलीकडे या सर्व घटकांना कालबाह्य ठरविण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे जाणवते. भारतीय मूल्यव्यवस्थेची टिंगल, परंपरांची खिल्ली, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेविषयी अविश्वास निर्माण करणे, अस्तित्वात नसलेल्या भीतीचे वातावरण तयार करणे, या सर्व गोष्टी समाजमनावर परिणाम करत आहेत. 'जागतिक नागरिक' निर्माण करण्याच्या नावाखाली इतिहासविहीन, धर्मविहीन आणि कुटुंबविहीन समाजाची संकल्पना पुढे आणली जात आहे, अशीही टीका होताना दिसते. स्थानिक ओळखींचे लाभ घेऊन सर्वांना एकसारख्या साच्यात बसविण्याचा प्रयत्न हा सांस्कृतिक विविधतेलाच धोका ठरू शकतो. जागतिकीकरणाच्या युगात व्यापक दृष्टी आवश्यक असली, तरी त्यासाठी मूळांपासून तुटणे हे समाधान नव्हे. या विचारप्रवाहाचा प्रभाव केवळ सामाजिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिलेला नाही. शिक्षणव्यवस्था, माध्यमे, पुस्तकप्रकाशन, व्याख्याने, डिजिटल प्लॅटफॉर्म, या सर्व माध्यमांतून तो पोहोचत आहे. आर्थिक क्षेत्रातही त्याचे प्रतिबिंब दिसू लागले आहे. मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि वित्तीय संस्था जागतिक अर्थकारणावर प्रभाव टाकतात. गुंतवणूक, संस्थांचे मूल्यमापन आणि निधीवाटप यामध्ये विशिष्ट सामाजिक-प्रशासकीय निकषांना प्राधान्य दिले जात आहे. परिसरीय, सामाजिक आणि प्रशासकीय निकषांच्या आधारे कंपन्यांची कार्यक्षमता मोजली जाते. पर्यावरणसंरक्षण, सामाजिक जबाबदारी आणि सुशासन या संकल्पना निश्चितच महत्त्वाच्या आहेत; मात्र त्यांच्या नावाखाली जर संस्थांवर काही विशिष्ट विचारधारांचे दडपण आणले जात असेल, तर ते चिंतेचे कारण आहे. गुण, कार्यक्षमता आणि कौशल्य यांपेक्षा 'समानता' या संकल्पनेचा संकुचित अर्थ लावून निर्णय घेतले गेले, तर दीर्घकालीन परिणाम गंभीर होऊ शकतात. या सर्व घडामोडींचा सर्वाधिक परिणाम तरुण पिढीवर होत आहे. सोशल मीडियाच्या प्रभावामुळे आणि शिक्षणातील बदलांमुळे पारंपरिक मूल्यांविषयी संशय, कुटुंबसंस्थेविषयी उदासीनता आणि स्वच्छंदतेकडे झुकणारी प्रवृत्ती वाढताना दिसते. स्वातंत्र्य आणि उच्छृंखलता यांतील सूक्ष्म सीमारेषा पुसट होत चालली आहे. श्रद्धा आणि विवेक यांचा समतोल साधण्याऐवजी एकांगी विचारसरणीकडे झुकण्याची प्रवृत्ती चिंताजनक आहे. याचा अर्थ असा नाही की, समाजाने प्रगतीला नकार द्यावा किंवा अन्यायाविरुद्ध आवाज उठवू नये. परंतु कोणतीही संकल्पना आंधळेपणाने स्वीकारण्याऐवजी तिचे परिणाम, उद्दिष्टे आणि दूरगामी परिणाम यांचा विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय आणि सांस्कृतिक सातत्य यांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. आज जे संकेत ऐकू येत आहेत, ते केवळ बदलाचे नाहीत; ते सावधतेचेही आहेत. जर या अपायघंटेचा निनाद आपण ऐकला नाही, तर उद्या पश्चात्ताप करण्यावाचून पर्याय उरणार नाही. समाज, कुटुंब आणि राष्ट्र या त्रिसूत्रीचा विचारपूर्वक विचार करूनच पुढील वाटचाल ठरवावी लागेल. अन्यथा प्रगतीच्या नावाखाली आपण स्वतःच्या मुळांपासून दूर जाऊ, आणि तेव्हा परत येण्याचा मार्ग कदाचित शिल्लक राहणार नाही.

# लढल्याशिवाय न्याय मिळत नाही : अक्काताई तेली






भारतासारख्या प्रगतिशील देशात आजही महिलांवर होणारे अत्याचार, अन्याय आणि शोषण ही कटू वास्तवता आहे.

कौटुंबिक हिंसाचार, संपत्तीवरील हक्क नाकारणे, बालविवाह, आर्थिक वलंबित्व, सामाजिक दबाव या साखळदंडांनी अनेक स्त्रिया आजही जखडलेल्या आहेत. कायद्याने हक्क दिले असले तरी, त्या हक्कांपर्यंत पोहोचण्याचा मार्ग अनेकदा खडतर असतो. अशिक्षित किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी तर न्यायप्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची ठरते. समाजाच्या या वास्तवात काही स्त्रिया केवळ अन्याय सहन करत नाहीत, तर त्याला ठामपणे उत्तर देतात. त्या स्वतः उभ्या राहतात आणि इतरांनाही उभं करतात. अशाच एका जिद्दी, धैर्यवान आणि संघर्षशील स्त्रीची ही कहाणी आहे. बालवयातच संसाराच्या ओझ्याखाली दडपली गेलेली, औपचारिक शिक्षणाचा स्पर्शही न झालेली एक महिला परंतु मनाने अत्यंत कणखर. अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्याची हिंमत तिच्यात होती. समाजसुधारकांच्या विचारांनी प्रेरित होऊन यांच्या तत्त्वज्ञानाने तिच्या मनात स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. आणि तिने आपल्या जीवनाचा मार्ग बदलला. अशिक्षित असूनही तिने न्यायालयाची पायरी चढली, कायद्याचा अभ्यास केला आणि स्वतःचा हक्क मिळवला.ही केवळ वैयक्तिक लढाई नव्हती;ही त्या प्रत्येक स्त्रीची लढाई होती जिला समाजाने दुय्यम स्थान दिलं.

आजही भारतात अनेक महिला भीती, लाज आणि सामाजिक दबावामुळे अन्याय सहन करत राहतात. त्यांना आधार, मार्गदर्शन आणि धैर्याची गरज असते. अशा वेळी एखादी स्त्री स्वतःचा संघर्ष प्रेरणेत रूपांतरित करते,तेव्हा ती केवळ व्यक्ती राहत नाही ती परिवर्तनाची चळवळ बनते. ती चळवळ म्हणजे अक्काताई तेली.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरवळ गावात बालवयातच संसाराच्या ओझ्याखाली दबलेल्या एका मुलीने

पुढे संपूर्ण परिसरातील महिलांसाठी लढणारी आधारवड बनावी, हीच कदाचित काळाची गरज होती. अवघ्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह महादेव तेली यांच्याशी झाला. खेळण्याच्या वयात संसार, त्यात पती व्यसनी आणि दोघांच्या वयात मोठी दरी अक्काताईंच्या आयुष्याची सुरुवातच संघर्षाने झाली. पतीकडून वारंवार होणारा छळ, मारहाण आणि मानसिक त्रास त्या सहन करत राहिल्या; कारण त्यांच्या पदरी दोन लहान मुली होत्या. मुलींच्या भविष्यासाठी मी सगळं गिळून टाकलं, त्या आजही ठामपणे सांगतात. परंतु नियतीने आणखी एक आघात केला मुलींच्या जन्मानंतर त्यांच्या पतीचे निधन झाले. त्यानंतर सासरच्या मंडळींनी त्यांना मुलींसह घराबाहेर काढले. हा प्रसंग आयुष्य उद्ध्वस्त करणारा होता; पण अक्काताई खचल्या नाहीत.

लहानपणापासून त्यांच्यावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा खोलवर प्रभाव होता. त्या म्हणतात, बाबासाहेबांनी सांगितलं शिका, संघटित व्हा, आणि संघर्ष करा. मी शाळेत गेले नव्हते; पण आयुष्यानेच मला शिकवलं.नवऱ्याच्या संपत्तीवर पत्नीचा हक्क असतो, हे त्यांना ठाऊक होतं. अन्याय सहन करायचा नाही, हा निर्धार मनाशी पक्का करून त्यांनी जयसिंगपूर न्यायालयाची पायरी चढली. कोर्टात त्यांच्या पतीच्या नातेवाईकांनी

संपत्तीच्या वादासाठी त्या महादेव यांच्या पत्नीच नसल्याचा दावा केला. मात्र अक्काताईंनी धीर सोडला नाही. आवश्यक कागदपत्रे, साक्षीदार आणि पुरावे गोळा करून त्यांनी स्वतः युक्तिवाद मांडला. अखेरीस न्यायालयाने त्यांना पत्नी म्हणून मान्यता देत हक्क बहाल केला.

सत्य उशिरा जिंकतं, पण हरत नाही, त्या अभिमानाने सांगतात. सुमारे ३२ वर्षांपूर्वी, वयाच्या चाळिशीत त्यांनी ही लढाई जिंकली. विशेष म्हणजे त्या कधीही औपचारिक शिक्षण घेतलेल्या नव्हत्या. केस लढताना त्यांनी पोलीस स्टेशन, न्यायालयीन प्रक्रिया, अर्ज-प्रतिज्ञापत्र यांचा बारकाईने अभ्यास केला. अडाणी लोक कोर्टात येतात तेव्हा त्यांना काहीच कळत नाही. म्हणून मी आधी स्वतः शिकलं, असे त्या स्पष्ट करतात.स्वतःचा हक्क मिळवल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. समाजातील पीडित, अत्याचारग्रस्त आणि अन्याय झालेल्या महिलांसाठी काम करण्याचा निर्धार त्यांनी केला. अनेक वर्षांच्या कोर्टातील वावरामुळे जयसिंगपूर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील वकील समुदाय त्यांना ओळखू लागला. शिक्षण नसतानाही कायद्याची जाण आणि आत्मविश्वास यामुळे त्या वेगळ्याच भासतात.

कौटुंबिक हिंसाचार, जमिनीचे वाद, संपत्तीवरील हक्क अशा प्रश्नांनी त्रस्त महिला त्यांच्याकडे येतात. आर्थिक परिस्थिती नसलेल्या महिलांना सरकारी वकील मिळवून देणे, कागदपत्रांची पूर्तता करणे आणि प्रक्रियेची माहिती देणे हे त्या स्वतः पुढाकार घेऊन करतात. काही वकील भरमसाठ पैसे मागतात. कागदपत्रे घेतात आणि काम पुढे नेत नाहीत. अशावेळी मी बार असोसिएशनकडे तक्रार करायला अजिबात घाबरत नाही, असे त्या ठामपणे सांगतात. या धाडसी भूमिकेमुळे त्यांना धमक्या आणि हल्ल्यांनाही सामोरं जावं लागलं. रात्री दोन-दोन वाजता गुंड दार ठोठावायचे. मी हातात खुरपं-विळा घेऊन शेतात हिंडायचे, त्या आठवतात. एका हल्ल्यात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली आणि महिनाभर रुग्णालयात उपचार घ्यावे लागले. तरीही त्यांचा आवाज दबला नाही. उपजीविकेसाठी त्यांनी शेतमजुरी केली, बिडी फॅक्टरीत काम केलं. त्या काळी दिवसाला फक्त ३ रुपये मजुरी मिळत होती. तीन रुपयांत संसार कसा चालणार? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. समितीकडे मागणी केली; नकार मिळाल्यावर आंदोलन उभारलं आणि मजुरी १० रुपयांवर नेली. हीच त्यांची संघर्षशैली. आज अक्काताई तालुका व जिल्हा पातळीवरील अनेक महिला समित्यांवर कार्यरत आहेत. त्यांचा संदेश स्पष्ट आहे, एक काठी सहज मोडते; पण काठ्यांचा बिंडा मोडत नाही. तसं महिलांनी एकत्र यायला हवं. मोर्चात यायला हवं, आवाज उठवायला हवा. वयाच्या ७३ व्या वर्षीही त्यांची जिद्द तितकीच ताजी आहे. अन्यायाच्या विरोधात उभं राहण्याची हिंमत आणि संघटित शक्तीवरचा विश्वास हीच त्यांची खरी ताकद. अक्काताई तेली यांची जीवनगाथा केवळ वैयक्तिक संघर्षाची नाही; ती सामाजिक परिवर्तनाची प्रेरक कहाणी आहे. त्यांच्या शब्दांत सांगायचं तर, लढल्याशिवाय काही मिळत नाही; आणि लढा दिला तर न्याय नक्की मिळतो..

अक्काताईंचा जीवनप्रवास म्हणजे वेदनेतून घडलेली जिद्दीची शिल्पकथा आहे. परिस्थितीने वारंवार पाडलं, पण त्यांनी प्रत्येक वेळी नव्या ताकदीने उभं राहणं निवडलं. त्यांनी स्वतःसाठी हक्क मागितला आणि इतरांसाठी लढण्याचा मार्ग स्वीकारला. भीती, अपमान आणि अडथळे यांना त्यांनी कधीच शरणागती पत्करली नाही. त्यांच्या धैर्यामुळे अनेक निराधार महिलांना आधार मिळाला. संघर्ष हा त्यांचा स्वभाव बनला आणि स्वाभिमान ही त्यांची ओळख ठरली.

कायद्याची भाषा न कळणारी स्त्री न्यायाची दिशा दाखवणारी बनली. त्यांच्या कृतीतून आशेचा किरण आजही तेजाने झळकतो. अक्काताईंचं आयुष्य म्हणजे अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं जिवंत प्रेरणास्थान आहे. परिस्थितीपेक्षा मनाची ताकद मोठी असते हे सांगणारी ही यशोगाथा..

**-डॉ. दीपाली पांडे देशमुख**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाविद्यालय, राणी सावरगाव

# आयुष्याची स्पर्धा परीक्षा

आज सकाळी-सकाळी एका अनोळखी पंचवीस वर्षीय स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या संदेश (नाव बदललेले आहे) नावाच्या एका मुलाचा फोन आला. सतत त्याच्या डोक्यात काही दिवसांपासून आत्महत्येचे विचार येत आहेत. त्यामुळे त्याचे बऱ्याच दिवसापासून अभ्यासात लक्ष नाही. सततची चिडचिड, मनाची अस्वस्थता, यामुळे तो निराश झालेला आहे. मनातून पूर्णपणे खचलेला असल्याचे त्याने सांगितले. त्याला विश्वासात घेऊन आत्महत्या करण्यामागील कारण विचारले असता कळले की, सतत स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून एक दोन मार्क कमी आल्याने प्रत्येक परीक्षेत आलेले अपयश. आई वडिलांच्या वाढत्या अपेक्षा, समाजाचा दबाव. वाढते वय. त्यामुळे तो आज निराशेच्या कचाट्यात सापडलेला आहे. त्यामुळे त्याला तिथून बाहेर निघण्यासाठी मार्ग मिळत नसल्याने त्याच्या मनात आत्महत्येचे विचार येत आहेत.



खरंतर स्पर्धा परीक्षा देणाऱ्या बहुसंख्य विद्यार्थ्यांची स्थिती आज संदेश सारखी झालेली आहे. संदेश हा फक्त त्या क्षेत्रातील एक प्रातिनिधिक उदाहरण म्हणून घेता येईल. त्यामुळे अशा लाखो संदेशच्या आयुष्याचे काय? याचा विचार कुणीही करत नाही. आज अनेकांनी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत करत वयाची तिशी, पस्तीशी ओलांडली आहे पण हातात नोकरी नाही. अनेकांमध्ये कोणतेही कौशल्य नाही. स्पर्धा परीक्षेशिवाय कोणताही मार्ग त्यांच्याकडे नाही. काय करावे अशा विद्यार्थ्यांनी? कुणापुढे मांडाव्यात स्वतःच्या व्यथा? कोण अशा बहुसंख्य विद्यार्थ्यांचे दुखणे ऐकून घेईल? असे अनेक प्रश्न आज निरुत्तर आहेत. कारण स्पर्धा परीक्षा ही अनेकांच्या आयुष्याचीच परीक्षा घेत असताना आपल्याला दिसून येईल.

स्पर्धा परीक्षा म्हणजेच संपूर्ण आयुष्य आहे असा अनेकांचा आज निर्धार झालेला आपल्याला दिसून येतो. एखाद्या यशस्वी झालेल्या अधिकाऱ्याचे भाषणे ऐकून, संघर्ष वाचून उठ सुट स्वतःची क्षमता नसताना सुद्धा अनेकजण स्पर्धा परीक्षेची तयारी करायला लागला आहे आणि या स्पर्धा परीक्षेच्या महाजाळात अलगद स्वतःला अडकवत आहेत. कारण स्पर्धा परीक्षेला आत जाण्याचा मार्ग अनेकांसाठी खुला आहे परंतु परत येताना अनेकांचे मार्ग बंद झालेले आहेत. त्यामुळे अनेक विद्यार्थी मोठ्या ताणतणावात स्वतःचे आयुष्य जगत आहेत. खरंतर आवड म्हणून स्पर्धा परीक्षेकडे वळलेल्या विद्यार्थ्याला आज स्पर्धा परीक्षेचे व्यसन लागलेले आहे हे म्हणणे हल्लीची बेरोजगारीची स्थिती बघता चुकीचे ठरणार नाही.

स्पर्धा परीक्षेची तयारी करत असताना अभ्यास करूनही जर स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करता आली नाही आणि अधिकारी होता आले नाही तर पुढे काय? याचे कोणतेही नियोजन स्पर्धा परीक्षा देणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांकडे आज नाही. दिवसेंदिवस प्रत्येक क्षेत्रातील वाढते खाजगीकरण, वाढती बेरोजगारी त्यामुळे आज अनेक विद्यार्थी निराश, हताश होऊन जीवन जगत असताना आपल्याला दिसत आहेत. यातील काही विद्यार्थी बोलून मन हलके करतात तर काही क्षणात अबोल होऊन स्वतःला संपवितात. कारण आजच्या जीवघेण्या स्पर्धेत अनेकांचा टिकाव लागत नसल्याचे चित्र निर्माण झालेले आहे.

आजच्या स्पर्धा परीक्षा पारदर्शक होत नसल्याचे अनेकदा दिसून आलेले आहे. पेपरफुटी, सेटिंग करून जागा भरल्या जात आहेत. त्यामुळे अशा अनेक प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या संदेशच्या आयुष्याची राखरांगोळी होत आहे. तेव्हा स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या विद्यार्थ्यांना हेच सांगणे आहे की, आपल्याकडे प्लॅन बी असणे फार गरजेचे आहे. कारण स्पर्धा परीक्षा म्हणजेच सर्व काही आहे असे अजिबात नाही. त्यामुळे स्पर्धा परिक्षा नाही जमत असेल तर शक्य तेवढ्या लवकर तिथून बाहेर निघून जगण्याचे नवे मार्ग आपण शोधले पाहिजे. लोक काय म्हणतील याचा तिळमात्र विचार न करता ज्या क्षेत्रात आपली आवड आहे तिथे स्वतःचे साम्राज्य निर्माण केले पाहिजे. कारण लोक हसायला येतात पोसायला नाही.

आपल्या आजूबाजूला असलेले आपले हितचिंतक आपल्याला स्पर्धा परीक्षेकडे लक्ष देण्यास सांगत असतील तरीही आपल्या उणीवा आणि क्षमता समजून घेऊन स्पर्धा परीक्षेकडे आपण वळले पाहिजे. अन्यथा मोठ्या खुर्चीची स्वप्ने रंगवत असताना आपली स्वप्ने, इच्छा, आवडी निवडी कधी मातीत मिसळतील हेही बऱ्याचदा सांगता येत नाही. त्यामुळे स्वतःला जे योग्य वाटते आणि ज्या क्षेत्रात आपण बाप आहोत त्याच क्षेत्रामध्ये आपण आपली पुढची दिशा ठरवली पाहिजे. त्यामुळे शेवटी एकच सांगणे आहे की, आवडीच्या क्षेत्रात नक्की जा परंतू तिथे जात असताना आपल्यासोबत प्लॅन बी नक्की तयार ठेवा. कारण चुकून अचानक अपयश आले तरीही तिथे स्वतःला सावरता आले पाहिजे आणि नव्याने नव्या मार्गासह उभे राहता आले पाहिजे. कारण आयुष्याच्या परिक्षेशिवाय जगात कोणतीही परीक्षा मोठी नाही.

**-सुरज पी. दहागावकर**
चंद्रपूर
मो. न. ८६९८६१५८४८

# विश्व विजयापासून एक पाऊल दूर



मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या टी २० विश्वचषक स्पर्धेच्या दुसऱ्या उपान्त्य फेरीत भारताने इंग्लंडला ७ धावांनी हरवून अंतिम फेरीत धडक मारली आणि सलग दुसऱ्यांदा टी २० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत पोहचण्याची करामत केली. अर्थात भारताला हा विजय सहज मिळाला नाही हा सामना शेवटच्या चेंडूपर्यंत रंगला. अतिशय रोमहर्षक ठरलेल्या या सामन्यात इंग्लंडने भारताला जशास तसे उत्तर देऊन १४५ कोटी जनतेच्या हृदयाचे ठोके वाढवले. बुधवारी न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला सहज हरवत अंतिम फेरी गाठली अंतिम सामन्यात त्यांच्या सोबत कोण खेळणार याचे उत्तर गुरुवारच्या सामन्यातून मिळणार होते त्यामुळे सर्वांची नजर टीव्ही कडे लागली होती.

इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुक्स याने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली. प्रथम गोलंदाजी घेऊन भारताला लवकरात लवकर बाद करण्याचा त्याचा मनसुबा होता त्याचा हा मनसुबा काही प्रमाणात यशस्वी होताना दिसला. भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा पुन्हा एकदा स्वस्तात बाद झाला पण दुसरा सलामीवीर आणि महत्वाच्या क्षणी फॉर्मात आलेल्या यष्टिरक्षक फलंदाज संजू सॅमसनने त्याच्या मनसुब्यावर पाणी फेरले. त्याने या सामन्यातही तडाखेबंद फलंदाजी करत ८९ धावा तडकावल्या. त्याला ईशान किशन, शिवम दुबे याने चांगली साथ दिली. हार्दिक पांड्या, तिलक वर्मा आणि सूर्यकुमार यादव यांनीही छोट्या, पण महत्वाच्या खेळी केल्याने भारताने २० षटकात २५३ धावा काढल्या.

टी २० विश्वचषकात सलग दोनदा अडीचशे धावांचा टप्पा ओलांडणारा भारत हा जगातला पहिला संघ ठरला. उपान्त्य फेरीसारख्या निर्णायक सामन्यात अडीचशे धावांचा पाठलाग करणे सोपे नसते त्यामुळे भारत हा सामना सहज जिंकेल असा कयास बांधला जात होता. सर्वांनाच तसे वाटत होते मात्र इंग्लंडच्या फलंदाजांच्या मनात वेगळेच होते. त्यांचा सलामीचा फलंदाज फील सॉल्ट आणि कर्णधार हॅरी ब्रुक्स स्वस्तात बाद झाले पण युवा जेकब बेथेल ने हार मानली नाही.

एकीकडे समोरचे फलंदाज बाद होत असताना त्याने एकबाजू लावून धरली ती ही तडाखेबंद फलंदाजी करत. फलंदाज जरी बाद होत असले तरी त्यांनी जवळपास बाराच्या सरासरीने धावा काढणे सुरूच ठेवले त्यामुळेच सतराव्या षटकापर्यंत सामना इंग्लंडच्या आवाक्यात होता मात्र १८ व्या षटकात बुमराने अवघ्या सहा धावा देऊन सामना भारताच्या बाजूने झुकवला. पुढच्याच षटकात हार्दिक पांड्याने त्याची पुनरावृत्ती केली आणि विजयावर शिक्कामोर्तब केले. या दरम्यान जेकब बेथेल याने आपले शतक पूर्ण केले पण त्याचे शतक व्यर्थ्य गेले आणि भारत अंतिम फेरीत पोहचला. भारताच्या या विजयाचे शिल्पकार संजू सॅमसन आणि जसप्रीत बुमरा ठरले.

संजू सॅमसनला सामन्याचा मानकरी पुरस्कार मिळाला पण त्याने मोठ्या मनाने जसप्रीत बुमरा हा या पुरस्काराचा खरा मानकरी असल्याचे कबूल केले. या विजयासोबतच भारताने विश्व विजयाकडे आणखी एक दमदार पाऊल टाकले. भारत आता विश्व विजयापासून अवघे एक पाऊल दूर आहे. जर भारतीय खेळाडूंनी आपल्या क्षमतेनुसार खेळ केला आणि नशिबाने साथ दिली तर भारत हे एक पाऊल पार करून सलग दुसऱ्यांदा आणि आणि एकुणात तिसऱ्यांदा आणि ते ही घरच्या मैदानावर टी २० विश्वचषकावर नाव कोरून इतिहास रचू शकतो. अंतिम फेरीसाठी भारतीय संघाला खूप खूप शुभेच्छा!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# शाश्वत पाण्यासाठी जिल्ह्यात ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सव -सीईओ मेघना कावली

**नांदेड (प्रतिनिधी)–** ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढवण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जिल्ह्यात दि. ८ ते २२ मार्च दरम्यान जलमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या जलमहोत्सवात सर्व नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले आहे.



पाणी ही केवळ पायाभूत सुविधांची बाब राहिलेली नाही तर ती सांस्कृतिक पद्धती म्हणून पाण्याची जपणूक करावी. पाण्याच्या संवर्धानासाठी स्थानिक परंपरा यांचा उपयोग मुख्यत: विचारात घ्यावेत. गावागावांत पाणी तपासणीसाठी महिलांना प्रोत्साहन देणे, फिल्ड टेस्टिंग किटद्वारे पाण्याची गुणवत्ता तपासणी करणे. प्रत्येक गावात युवकांचा जल संवर्धनासाठी सहभाग घेण्याकरिता यंग बिग्रेडची स्थापना करावी. जिल्ह्यातील शाळांमध्ये जलसंवर्धनासाठी स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच ग्रामपंचायत विकास आराखड्यात पाण्याच्या संवर्धनासाठी उपाययोजनांचा समावेश या महोत्सवांतर्गत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील गावोगावी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत विविध उपक्रम या प्रसंगी राबवले जाणार आहेत.

पाणी पुरवठा सामुदायिक जीवनामध्ये खोलवर रुजलेली एक महत्त्वाची बाब आहे. ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत आणि मजबूत करण्यासाठी सामुदायिक लोकसहभाग वाढवण्यासाठी दि. ८ ते २२ मार्च या कालावधीत जलमहोत्सव राबवला जाणार आहे, अशी माहिती पाणी व स्वच्छता विभागाचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी मयूरकुमार आंदेलवाड यांनी दिली.

गाव व पंचायत समिती स्तरावर लोक जलउत्सव आयोजित केला जाईल. जो पूर्णपणे लोकसहभागावर आधारीत असणार आहे. पिण्याच्या पाण्याला सांस्कृतिक आणि सामाजिक प्राधान्य देणे, स्थानिक जलउत्सव संस्थांत्मक करण्यासाठी प्रोत्साहित करणे, राज्य ते गावस्तरापर्यंत विविध विभागांमध्ये समन्वय साधणे, पाणी गुणवत्ता, सौर ऊर्जा आणि देखभाल दुरूस्तीसाठी दीर्घकालीन आराखडा तयार करणे, आरोग्य, पोषण आणि महिला सक्षमीकरणाला जलसेवेशी जोडणे हा जल-महोत्सवाच्या उपक्रमामागचा उद्देश आहे, अशी माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब यांनी दिली आहे.

गावागावांत पाणी तपासणीसाठी महिलांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. आरोग्य आणि पाणी यांचा समन्वय राखला जाणार आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीवर भर देण्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार केले जाणार आहे. यंग ब्रिगेडची स्थापना आणि शाळांमध्ये जलसंवर्धनासाठी स्पर्धा घेतल्या जाणार आहेत. जलमहोत्सवात गावात ग्रामसभा आणि पाणी समितीद्वारे प्रत्यक्ष कृतीवर भर दिला जाणार आहे. महिलांद्वारे फिल्ड टेस्टिंग किटद्वारे जल गुणवत्ता चाचणी घेतली जाणार आहे. लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी आपल्या गावातील जलस्त्रोतांच्या संरक्षणासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. जलस्त्रोतांचे पुनरूज्जीवन आणि स्वच्छता करणे, पाणी पुरवठा योजनांचे औपचारिक हस्तांतरण आणि सामुदायिक शपथं घेणे, ग्रामपंचायत विकास आराखड्यात पाण्याचा समावेश करण्यावर भर दिला जाणार आहे, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी सांगितले आहे.

## आदिवासी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना प्रशिक्षण

**नांदेड (प्रतिनिधी)–** आदिवासी उमेदवारांकरिता कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र किनवट या प्रशिक्षण केंद्रात १ एप्रिल २०२६ पासून सुरू होणाऱ्या ११४ व्या प्रशिक्षण सत्रात आदिवासी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांकरिता विविध स्पर्धा परीक्षाच्या तयारीकरिता प्रवेश देण्यासाठी २७ मार्च २०२६ तत्पूर्वी कार्यालयास पोहचतील अशा बेताने आदिवासी (अनुसूचित जमाती) उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आली आहेत, असे आवाहन कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी किनवट यांनी केले आहे.

प्रशिक्षण सत्रात नौकऱ्यासाठी द्याव्या लागणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेण्यात येते. तसेच आदिवासी उमेदवारांसाठी राबविण्यात येणाऱ्या इतर खात्याच्या स्वयंरोजगार योजनांची माहिती देऊन मार्गदर्शन केले जाते. पात्र इच्छुक उमेदवारांनी शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ पर्यंत शैक्षणिक व जातीचे प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावेत. कार्यालयाचा पत्ता आदिवासी उमेदवारांकरीता, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, माहिती व मार्गदर्शन केंद्र, शासकीय तंत्र प्रशाला औद्योगिक प्रशिक्षण संस्थाच्या बाजुस गोकुंदा ता. किनवट जि.नांदेड पिन कोड-४३१८११ असून अधिक माहितीसाठी संपर्क दूरध्वनी क्र. - ९८८१५२४६४३, ७२१९७०९६३३, ९५१८९९७८६८, ०२४६९-२२१८०१ आहे.

# नेसुबो महाविद्यालयात 'करिअर घडविण्यात इंग्रजी विषयाची भूमिका' व्याख्यान संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागामार्फत आयोजित करिअर घडविण्यात इंग्रजी भाषेची भूमिका या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान उत्साहात संपन्न झाले.




कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. विलास बुवा (इंग्रजी विभाग प्रमुख, विश्वासराव रणसिंग महाविद्यालय इंदापूर, पुणे) हे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचे जागतिक महत्त्व, उच्च शिक्षणातील उपयुक्तता, तसेच स्पर्धा परीक्षा, नोकरीच्या संधी आणि व्यक्तिमत्त्व विकासामध्ये इंग्रजीचे असलेले स्थान तसेच प्रभावी सादरीकरण कसे करावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. जीवन मसुरे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. त्यांनी इंग्रजी विभागामार्फत विद्यार्थीकेंद्री राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.

पुढे बोलताना डॉ. बुवा यांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचन, इंग्रजी वर्तमानपत्रांचा अभ्यास, संभाषणाचा सातत्यपूर्ण सराव आणि आत्मविश्वास वृद्धी यांवर भर देण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी इंग्रजीची भीती न बाळगता ती आत्मसात करण्याचा निर्धार करावा, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुग्रीव फड होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी इंग्रजी विभागाचे अभिनंदन करून इंग्रजी भाषा ही केवळ एक विषय नसून जागतिक ज्ञानाशी जोडणारे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. अशा मार्गदर्शनपर कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यार्थ्यांनी कार्यक्रमालाउत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले. संवादात्मक पद्धतीने पार पडलेल्या या सत्रामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. याप्रसंगी डॉ. इर्शाद खान, डॉ. चंद्रशेखर येंगडे, प्रा. के. जे. कांबळे यांच्या सह महाविद्यालयातील इतर प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संदीप काळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ. संजय कुलकर्णी यांनी मानले.

# सायन्स कॉलेजमध्ये विज्ञान दिवस साजरा




**नांदेड (प्रतिनिधी) –** सायन्स कॉलेजमध्ये विज्ञान मंडळाच्या वतीने विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील हे होते.

तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एल. पी. शिंदे कार्यक्रमाचे आयोजक म्हणून उपस्थित होते. विज्ञान मंडळाचे समन्वयक डॉ. किरण शिल्लेवार यांनी प्रास्ताविक केले. या प्रदर्शनामध्ये महाविद्यालयातील विविध विभागाच्या वतीने विज्ञान प्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये मेंदू, फुफ्फुस, मूत्रपिंड, लहान आतडे, जुडवा मुलं यांची प्रदर्शनी भरविण्यात आली. सायन्स कॉलेजच्या सोबत एमओयू असलेले नांदेडचे ग्रामीण पॉलीटेक्निक कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रयोगांचे सादरीकरण केले.

या कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रो. डॉ. अरुणा राजेंद्र शुक्ला यांची उपस्थिती होती. तसेच या कार्यक्रमात डॉ. पी. एस. बोरकर, डॉ. पी. आर. कुलकर्णी, डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, डॉ. आर. व्ही. सांगवीकर, डॉ. एस. एस. मोदी, प्रा. सीमा पांडे, प्रा. माया राऊत, गौतम वाघमारे आदी उपस्थित होते. परीक्षक म्हणून डॉ. शैलजा वडजे व डॉ. दीप्ती तोटावार यांनी कार्य केले. सूत्रसंचालन उपप्राचार्य प्रा. ई एम. खिल्लारे यांनी केले तर उपस्थितांचे आभार डॉ विशाल मराठे यांनी मानले.

# मराठी माणसाच्या वैभवावर मराठीचे सामर्थ्य अवलंबून राहील -डॉ. हनुमंत भोपाळे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जे भाषिक सत्ताधीश आणि सामर्थ्यशाली होते, त्यांची भाषा जगभर गेली. भाषा हा राजकारणाचा नाही तर आस्थेचा आणि उपयोगाचा विषय होणे आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून मराठी भाषेचे संवर्धन होईलच असे नाही. प्रत्येक मराठी माणसाने आपल्या संवादातून व आचारविचारातून मराठी भाषेचे संवर्धन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. हनुमंत भोपाळे यांनी केले.



श्री संत गाडगे महाराज महाविद्यालयाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. भोपाळे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सिनेट सदस्य डॉ. अशोकराव गवते उपस्थित होते. याप्रसंगी मराठी विभागप्रमुख डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, बाबुराव बसवदे, व्ही. जी. चव्हाण यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. हनुमंत भोपाळे म्हणाले की, मराठी माणसाचा गौरव हाच खऱ्या अर्थाने मराठी भाषेचा गौरव आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वसामर्थ्याच्या बळावर स्वत:चे विश्व तयार करून स्वत:ची ओळख निर्माण करावी, असे सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोकराव गवते यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून मराठी भाषेची व साहित्याची परंपरा यावर भाष्य केले. आद्यकवी मुकुंदराजापासून श्रीकांत देशमुख, आसाराम लोमटे, देवीदास सौदागर या नव्या पिढीतील लेखकांचा साहित्य प्रवास उलगडून दाखवला.

यावेळी गुणवंत प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. एन. बेंडे यांनी तर आभार प्रा. डॉ. जयराम सूर्यवंशी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात वंदेमातरम या गीताने होऊन सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## प्रा. डॉ. उल्हास घारड आचार्य पदवीने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)–** अर्थशास्त्राचे अध्यापक उल्हास मनोहर घारड यांना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातर्फे 'अर्थशास्त्र' विषयात आचार्य पदवी (पीएच. डी.) प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी डॉ. जयराम गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती येथील संशोधन केंद्रांतर्गत अमरावती महसूल विभागांमध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाने केलेल्या गृहनिर्माण कार्याचे आर्थिक अध्ययन - कालखंड २०१० ते २०२० या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला.

# ने.सु.बो. महाविद्यालयाची कु. रंजना यादव हिचा सत्कार



**नांदेड (प्रतिनिधी)–** नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयाची राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट ऑफिसर कु. रंजना यादव हिची प्रजासत्ताक दिनानिमित्त नवी दिल्ली येथील ऐतिहासिक कर्तव्यपथ येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील प्रजासत्ताक दिन शिबिरासाठी महाराष्ट्र संचालनालयाच्या पथसंचलन पथकात निवड झाली होती.

प्रत्येक टप्प्यावर तिने आपली शारीरिक क्षमता, नेतृत्वगुण, शिस्त, आत्मविश्वास व देशभक्तीची जाणीव प्रभावीपणे सिद्ध केली. राष्ट्रीय स्तरावरील अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या प्रजासत्ताक दिन शिबिरात कु. रंजना यादव हिने अथक परिश्रम, जिद्द व सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर यश संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयातर्फे तिचा शाल, पुष्पगुच्छ व पुस्तक देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

# के. रामलू शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

**कुंडलवाडी (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे औचित्य साधून के. रामलू शाळेमध्ये सी. वी. रमण व मिसाईल मेन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या वेळी विद्यार्थ्यांनी एकाहून एक सरस प्रतिकृतींचे सादरीकरण करीत त्या प्रोजेक्टबद्दल सविस्तर माहिती दिली. यामुळे शाळेत बाल वैज्ञानिकांची या प्रदर्शनामध्ये शाळांमधील जवळपास ३४ प्रोजेक्ट प्रतिकृतींचे सादरीकरण करण्यात आले व एकूण सहभागी विद्यार्थी ८२ होते. यात आरोही कुंडलवाडीकर व वर्षीता शिंगणवाड यांनी भूकंप अलार्म व ईशान चव्हाण याने चंद्राच्या



कला या उपकरणाचे सादरीकरण केले. त्यात त्यांना प्रथम क्रमांक मिळाला. विद्युत प्रवाह आरुष, वरुणतेज, रत्नेश, कृष्णा व तसेच विद्युत बल्ब सार्थक लिंगमपल्ले, संभव माचनुरे यांनी या उपकरणाचे सादरीकरण केले. यात त्यांना द्वितीय क्रमांक मिळाला.

तसेच मानवी हृदयाचा नमुना सिझा शेख, संस्कृती व स्वरांगी यांनी मानवी हृदय तर वायू प्रदूषण तन्मय पवार, सिद्धेश तीपनोड यांनी हे उपकरणाचे सादरीकरण करून तृतीय क्रमांक मिळविला आहे. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांना गोल्ड, सिल्वर, ब्रांज मेडल देऊन सत्कार करण्यात आला. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पेन देऊन कौतुक करण्यात आले. इयत्ता चौथी, पाचवी, सहावीच्या पात्र विद्यार्थ्यांना देखील बक्षीस देण्यात आले. यात या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार, प्रिंसिपल एस. जाधव, व्हाईस प्रिंसिपल एम. सपना यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रदर्शनासाठी प्रिंसिपल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अश्विनी तुंगेनवार, संध्या पाठक, दार्शयानी नुग्रावार, सुधा मदिकुंटावार, लतिका जडलवार, मेघा नामावार, मयुरी शेवाळे, गीता धात्रक, राणी मठवाले, विकास मिसाळे, कृपेश पडकुटलावार, गणेश जेठाळकर, आदींनी परिश्रम घेतले.

## हदगाव शहरामध्ये लाईनमॅन डे उखळाई आश्रम येथे उत्साहात साजरा

**हदगाव (प्रतिनिधी)–** शहरातील ऊखळाई आश्रम येथे लाईनमॅन डे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वीज वितरण व्यवस्थेतील महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या लाईनमन कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी हदगाव तालुक्याचे उपकार्यकारी अभियंता संतोष परघणे, हदगाव शहराचे सहायक अभियंता मिटकरी, तळणी सर्कलचे सहाय्यक अभियंता नर्नवले व सर्व जनमित्र यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी लाईनमन कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवेत येणाऱ्या अडचणी, अनुभव आणि कार्यातील आव्हाने यांविषयी मनोगत व्यक्त केले.

कुठल्याही परिस्थितीमध्ये शहर व तालुक्यातील वीज ग्राहकांना त्रास होऊ नये किंवा त्यांना वीजपुरवठा खंडित झाल्यास तात्काळ उपस्थित राहून त्यांचा वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी त्यांचा नेहमीच खारीचा वाटा असतो यासाठीच जनमित्रांना प्रोत्साहन देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

# २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात रॅपने जिंकली उपस्थितांची मने



**नांदेड (प्रतिनिधी) –** साहित्य, सामाजिक विचार आणि परिवर्तनाची भूमिका अधोरेखित करणारे २० वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन नांदेड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यंदाच्या संमेलनाची सुरुवात पारंपरिक भाषणांऐवजी क्रांतिकारी रॅप सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी 'विद्रोहाचा आधुनिक आवाज' या संकल्पनेतून रॅपर प्रथम तारू, आर. के. स्वागर उर्फ रोहन कपाळे, विशाल इंगोले, विद्रोही साई पाटील आणि अक्षय पाईकराव यांनी सादर केलेल्या रॅपने उपस्थित तरुणाईत प्रचंड ऊर्जा निर्माण केली. सामाजिक विषमता, अन्याय, युवकांची स्वप्ने आणि परिवर्तनाची हाक या विषयांवर आधारित ओळींनी संमेलनाचे वातावरण दणाणून गेले.

रॅपर प्रथम तारू यांनी मराठवाड्यातील पूरस्थितीवर भाष्य करत 'उगं नवं माय नांदेड व्हय' या रॅपद्वारे पूरग्रस्तांच्या वेदना सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. तसेच हिंदीतील अरे आवाज उठाओ, जनता अब तो जाग जाओ, क्रांती की आग तुम खुद में जलाओ' या क्रांतिकारी रॅपमुळे सभागृह भारावून गेले. त्यांच्या सादरीकरणातून विद्रोह या शब्दांतच नव्हे तर कृतीतही असला पाहिजे असा ठाम संदेश देण्यात आला.

आर. के. स्वागर उर्फ रोहन कपाळे यांनी जोशपूर्ण जय भीम अँथमने कार्यक्रमाची रंगत वाढवली. व्यासपीठावर जय भीमच्या घोषणांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर शान आंबेडकर या रॅपमधून सामाजिक न्याय, समता आणि स्वाभिमानाचा संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला.

विद्रोही साहित्य परंपरेचा वारसा पुढे नेत, रॅपर विशाल इंगोले यांनी आधुनिक हिप-हॉप आणि पारंपरिक साहित्य यांचा सुंदर मिलाप सादर केला. तर साई पाटील यांनी युवकांची बेरोजगारी व देशातील राजकीय परिस्थितीवर भाष्य केले. अक्षय पाईकराव यांनी समाजपरिवर्तनाची गरज आपल्या शब्दांत मांडत विद्रोही विचार मांडले.

## जेनो फार्मासिटिकल औषध कंपनीची स्वारातीम विद्यापीठातील विद्यार्थ्यांना प्रि-प्लेसमेंट ऑफर

**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत स्कूल ऑफ फार्मसी येथे बी. फार्मसी व एम. फार्मसी विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता. हा उपक्रम ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग आणि स्कूल ऑफ फार्मसी, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट टीमच्या सहकार्याने पार पडला.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये जेनो फार्मासिटिकल लि. पुणे या नामांकित औषधनिर्मिती कंपन्यांनी सहभाग घेतला होता, विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन १८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

हा प्लेसमेंट ड्राईव्ह कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. ड्राईव्ह यशस्वी करण्याकरिता विद्यापीठाचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर डॉ. बालाजी मुधोळकर, स्कूल ऑफ फार्मसीचे संचालक डॉ. संजय पेकमवार, समन्वयक डॉ. शशिकांत ढवळे तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट समिती सदस्य वैशाली शेळके, वर्षा कदम आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सदर प्लेसमेंट उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अग्रगण्य औषधनिर्मिती व जैवतंत्रज्ञान क्षेत्रात करिअरच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध झाल्या असून विद्यापीठाच्या उद्योगाभिमुख शैक्षणिक धोरणाला अधिक बळकटी मिळाली आहे.

# मोफत आरोग्य शिबिरात ७०० रूग्णांची तपासणी



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** स्व. सरस्वतीमाई शामजी पाटील लामदाडे यांच्या स्मरनार्थ लोहा तालुक्यातील टाकळगाव येथे मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले. या शिबिराला गावातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी मोफत आरोग्य शिबिरात अस्थीरोग तज्ज्ञ डॉ. अवधुत मोरे, कान, नाक, घसा तज्ज्ञ डॉ. सचिन शिंदे, त्वचा रोग तज्ज्ञ डॉ. दीपक अरळे, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. राखी पवार, जनरल तज्ज्ञ डॉ. सुरेंद्र शिंदे, डॉ. समुख गायकवाड, स्त्री रोग तज्ज्ञ डॉ. पूजा लामदाडे, फिजोथेरोपी तज्ज्ञ डॉ. संभाजी लामदाडे, डॉ. प्रद्युम्न सातपुते, डॉ. रोहित वाघमारे यांनी गावातील शेकडो सहभागी ग्रामस्थांची तपासणी केली.

मोफत आरोग्य शिबिराचे उद्घाटन गुरूवर्य महंत श्री श्री १०८ समगिरी गुरु जयगिरी महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी महात्मा गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शंकरराव मोरे, तर प्रशासक सरपंच प्रतिनिधी भीमराव लामदाडे, ग्राम विकास अधिकारी अमृत शिंदे, पोलीस पाटील प्रताप मोरे, माजी सरपंच श्रीहरी पाटील लामदाडे, शिवसेना शाखा प्रमुख गोविंदराव मोरे, वरिष्ठ लिपीक विठ्ठल लामदाडे, रामदास लामदाडे यांच्यासह उपसरपंच संभाजी चिंतोरे, ग्रामपंचायत सदस्य दत्ता देवकांबळे, सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी पाटील मोरे, पंढरी पाटील थेटे व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामविकास अधिकारी अशोक लामदाडे यांनी केले. या शिबिरात सातशे रुग्णांची मोफत तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य शिबिराचे सूत्रसंचालन विठ्ठल लामदाडे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमराव लामदाडे आणि उपस्थितांचे आभार शिवाजीराव मोरे यांनी मानले.

# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

# फ्रिज आणि भिंतीमध्ये किती अंतर ठेवावे?



## तुमचे वीज बिल होईल कमी अन् रेफ्रिजरेटरचे वाढेल आयुष्य...

**उन्हाळा हंगाम सुरू झाला आहे आणि या काळात रेफ्रिजरेटरची काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. तुम्ही तुमच्या रेफ्रिजरेटरला भिंतीशी जोडणाऱ्यांपैकी आहात का किंवा खूप लहान अंतर सोडणाऱ्यांपैकी आहात का? यामुळे तुमच्या रेफ्रिजरेटरचे आयुष्य कमी होते आणि तुमचे वीज बिल वाढते. रेफ्रिजरेटर आणि भिंतीमधील अंतर राखणे आवश्यक आहे. ते किती असावे हे आम्ही सांगतो.**

रेफ्रिजरेटर आणि भिंतीमधील अंतर महत्वाचे आहे कारण ते वायुवीजन राखते. जर कमी किंवा कोणतेही अंतर नसेल, तर रेफ्रिजरेटर बॉडी गरम होऊ शकते आणि हवा त्याभोवती फिरू शकत नाही, ज्यामुळे रेफ्रिजरेटरचे नुकसान होऊ शकते. यामुळे त्याच्या कामगिरीवर परिणाम होऊ शकतो आणि तुमचे वीज बिल वाढू शकते.

### रेफ्रिजरेटर कॉइल्सना हवेची आवश्यकता

अहवालानुसार, रेफ्रिजरेटरमध्ये बॉडीच्या मागे किंवा खाली कॉइल्स असतात. या कॉइल्समध्ये उष्णता निर्माण होते, म्हणून त्यांना हवेचा प्रवाह आवश्यक असतो. रेफ्रिजरेटर आणि भिंतीमधील अंतर निवडताना, कॉइल कुठे बसवले आहेत याकडे लक्ष दिले पाहिजे. जर तुम्ही नवीन रेफ्रिजरेटर खरेदी करत असाल तर त्याची लांबी, रुंदी आणि खोली आधीच मोजा. तुम्ही रेफ्रिजरेटर कुठे ठेवणार आहात ते देखील मोजा.

### रेफ्रिजरेटर-भिंतीमध्ये किती अंतर ठेवावे?

रेफ्रिजरेटर आणि भिंतीमधील अंतर प्रत्येक मॉडेलनुसार बदलू शकते. उदाहरणार्थ, सिंगल-डोअर फ्रिजसाठी ते थोडे कमी आणि मोठ्या फ्रिजसाठी जास्त असू शकते. अहवालांनुसार, फ्रिजच्या मागील बाजूस आणि भिंतीमध्ये १ ते २ इंचाचे अंतर सोडले पाहिजे. जर जास्त जागा असेल तर मोठे अंतर सोडले जाऊ शकते. यामुळे साफसफाई करणे सोपे होते. फ्रिजच्या दोन्ही बाजूंना एक इंच ते एक इंच आणि एक चतुर्थांश जागा सोडली पाहिजे. शिवाय, फ्रिजच्या वर एक इंच ते एक इंच आणि एक चतुर्थांश जागा उघडी सोडली पाहिजे.

### रेफ्रिजरेटर भिंतीजवळ ठेवण्याचे तोटे



- रेफ्रिजरेटर भिंतीवर ठेवल्याने त्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.
- रेफ्रिजरेटरमुळे निर्माण होणारी उष्णता भिंतीवरून उडी मारते आणि फ्रिजलाच गरम करते.
- जेव्हा रेफ्रिजरेटर जास्त गरम होतो तेव्हा तो त्याच्या कंप्रेसरवर दबाव आणतो आणि तुमचे वीज बिल वाढवतो.
- रेफ्रिजरेटर लवकर खराब होण्याची शक्यता असते, जे आर्थिकदृष्ट्या तणावपूर्ण असू शकते.

# टीव्हीचे आयुष्य करा दुप्पट, फक्त 6 गुप्त सेटिंग्ज करा चालू

**आजकाल टीव्ही वर्षानुवर्षे टिकतील अशा गुणवत्तेत येत नाहीत. तथापि, तुमच्या टीव्हीचे आयुष्य वाढवणे किंवा कमी करणे हे प्रत्यक्षात तुमच्या हातात आहे. जर तुम्ही तुमच्या टीव्हीच्या ६ गुप्त सेटिंग्जमध्ये छोटे बदल केलेत तर तुमच्या टीव्हीची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारेलच, शिवाय त्याचे आयुष्य दुप्पट देखील होऊ शकते. या सेटिंग्जमध्ये ब्राइटनेस योग्य पातळीवर सेट करणे, ॲम्बियंट लाईट सेन्सर चालू करणे, स्लीप टाइमर वापरणे, मूव्ही किंवा इको मोड सेट करणे, सॉफ्टवेअर अपडेट करणे आणि रिमोटऐवजी स्विचने टीव्ही बंद करणे यांचा समावेश आहे.**

- ब्राइटनेस आणि बॅकलाइट कमी करा : खूप जास्त बॅकलाइट आणि ब्राइटनेसमुळे टीव्ही डिस्प्लेच्या समस्या उद्भवू शकतात. या सेटिंग्ज सर्वोच्च पातळीवर सेट करण्याऐवजी रूमच्या ब्राइटनेस आणि डोळ्यांच्या आरामानुसार समायोजित करा. याचा अर्थ असा की टीव्हीची चित्र गुणवत्ता नेहमीच व्हिव्हिड किंवा डायनॅमिकवर सेट करू नका. टीव्हीचा डिस्प्ले ५०-६०% दरम्यान ठेवल्याने त्याचे आयुष्य लक्षणीयरीत्या वाढू शकते.
- अँबियंट सेन्सरला त्याचे काम करू द्या : आधुनिक टीव्हीमध्ये अनेकदा फोनसारखेच अँबियंट सेन्सर असतो. हे रूमच्या ब्राइटनेसनुसार टीव्हीची ब्राइटनेस समायोजित करते. जर तुमच्या टीव्हीमध्ये ही सेटिंग असेल, तर ते चालू ठेवा. ते केवळ वीज वाचवत नाही तर टीव्हीच्या हार्डवेअरचे जास्त काळ संरक्षण देखील करते.
- स्लीप टाइमरचा वापर वाढवा : असे अनेकदा दिसून येते की घरांमध्ये कोणीही पाहत नसतानाही टीव्ही चालू राहतात. अशा परिस्थितीत, स्लीप टाइमर किंवा ऑटो पॉवर ऑफ सेटिंग चालू केल्याने वीज वाचू शकते आणि टीव्हीचे आयुष्य वाढू शकते. ही सेटिंग सेट केलेल्या वेळी टीव्ही स्वयंचलितपणे बंद करते.
- मूव्ही किंवा इको मोड सेट करा : अहवालांनुसार, स्टँडर्ड मोडमध्ये टीव्ही वापरणे योग्य मानले जात नाही. हे मोड खूपच ब्राइट असतात आणि शोरूमसारख्या ठिकाणांसाठी असतात. घरी तुमचा टीव्ही मूव्ही किंवा इको मोडवर सेट केल्याने तुम्हाला नैसर्गिक रंग दिसतील याची खात्री होईलच पण टीव्हीच्या घटकांवरील ताण देखील कमी होईल.
- सॉफ्टवेअर अपडेट्स करत रहा : टीव्हींना फोनपेक्षा कमी अपडेट्स मिळू शकतात, परंतु ते मिळतात. हे अपडेट्स वेळेवर इन्स्टॉल करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून, तुमच्या टीव्हीचे सॉफ्टवेअर तपासत रहा आणि ते अपडेट करत रहा. अपडेट्समध्ये अनेकदा बग फिक्स आणि पॉवर मॅनेजमेंट फीचर्स समाविष्ट असतात जे तुमच्या टीव्हीचे कार्यप्रदर्शन आणि टिकाऊपणा सुधारतात.
- टीव्ही अनप्लग करून बंद करा : जेव्हा तुम्ही जास्त वेळ टीव्ही पाहणार नसाल, जसे की रात्री झोपण्यापूर्वी किंवा बाहेर जाण्यापूर्वी, तेव्हा रिमोटऐवजी स्विच वापरून टीव्ही अनप्लग करून बंद करा. यामुळे व्होल्टेज चढउतारांमुळे होणारे नुकसान होण्याचा धोका कमी होतो आणि सर्व घटकांना ब्रेक देऊन टीव्हीचे आयुष्य वाढते.

# बीएसएनएल ग्राहकांना कॉल दरम्यान आवाजात व्यत्यय, कारण काय...

**भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) वापरकर्त्यांना कॉल ड्रॉप आणि कनेक्टिव्हिटी समस्या येत आहेत. कनेक्टिव्हिटी समस्या पूर्वीपेक्षा अधिक आणि वारंवार येत आहे. याचे कारण सरकारी मालकीच्या टेलिकॉम कंपनीने त्यांच्या स्वदेशी 4G तंत्रज्ञानाची देशव्यापी चाचणी घेतल्याचे म्हटले जाते. बीएसएनएल देशभरातील विविध शहरांमध्ये स्वदेशी विकसित केलेल्या ४ जी तंत्रज्ञानाची चाचणी घेत आहे. या चाचणीमुळे लोकांना कंपनीच्या नेटवर्कवर कॉल ड्रॉप आणि कनेक्टिव्हिटी समस्या येत आहेत.**

चांगले नेटवर्क असलेल्या भागातही समस्या

ज्या भागात बीएसएनएलकडे सर्वोत्तम नेटवर्क होते, तिथेही लोकांना कनेक्टिव्हिटी समस्या येत आहेत. बीएसएनएलचे सर्वात मजबूत टेलिकॉम सर्कल मानले जाणाऱ्या केरळमधील अनेक ग्राहकांकडून तक्रारी आल्या आहेत. यामुळे लोक एअरटेल आणि जिओ सारख्या खाजगी टेलिकॉम ऑपरेटरकडे वळत आहेत. तक्रार करणारे वापरकर्ते म्हणतात की त्यांना डायल केलेला नंबर बंद असल्याचे सांगणारे स्वयंचलित संदेश ऐकू येतात, जेव्हा प्रत्यक्षात प्राप्तकर्त्याचा फोन चालू असतो. अनेक प्रकरणांमध्ये, कॉलर रिंगटोन ऐकतात, परंतु प्राप्तकर्त्याचा फोन वाजत नाही. कॉल दरम्यान वापरकर्त्यांनी एकेरी ऑडिओची तक्रार देखील केली आहे. या प्रकरणात एका टोकाचा आवाज दुसऱ्या टोकाकडून ऐकू येत नाही. काही ग्राहकांनी नोंदवले आहे की त्यांचे फोन रेंजच्या बाहेर दाखवले जातात. व्हॉइस कॉलच्या तुलनेत डेटा सेवा बऱ्यापैकी चांगले काम करते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये बीएसएनएलच्या स्वदेशी ४जी तंत्रज्ञानाचे उद्घाटन केले. हे दूरसंचार क्षेत्रात स्वावलंबी होण्याच्या दिशेने एक आवश्यक पाऊल म्हणून वर्णन केले गेले. त्याच वेळी, कंपनीने घोषणा केली होती की देशभरात स्वदेशी ४जी नेटवर्क स्थापित केले जाईल. परंतु, अहवालांनुसार, लाँच केलेली प्रणाली परिपूर्ण नव्हती. त्यावेळीही, काही सुधारणांची आवश्यकता होती. तथापि, टेलिकॉम टॉवरवर ४जी उपकरणे बसवण्यात आली आहेत आणि संबंधित पायाभूत सुविधांचे काम देखील पूर्ण झाले आहे. हे स्वदेशी ४जी स्टॅक टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) ने तेजस नेटवर्क्स आणि सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ टेलिमॅटिक्स (C-DOT) यांच्या सहकार्याने विकसित केले आहे.

# अजब-गजब

## लेडी रॉबिनहूड! गोरगरीबांना वाटते खाद्यपदार्थ, पैसे



हाँगकाँग : गोरगरीबांच्या मदतीला धावून येणारा रॉबिनहूड पाश्चात्त्य देशांतील बालकथांमध्ये प्रचंड गाजला आहे. याच रॉबिनहूडचा स्त्री अवतार सध्या चीनमध्ये लोक बघत आहेत. एक महिला चेहरा झाकून येते आणि गरीबांना खाण्यापिण्याचे साहित्य वाटते. त्यानंतर आपल्या घोड्याला टाच मारून क्षणात गायबही होते. या महिलेला लोक देवी मानू लागले आहेत. काळ्या ड्रेसमध्ये ही महिला येते. मुखवटा धारण केलेला असल्याने ती कोण आहे, हे ओळखता आलेले नाही. तिने स्वतःची ओळखही कधी सांगितली नाही. ती स्वतःला ऑर्चिड नाइट संबोधते. आर्चिड हे चीनमधील राष्ट्रीय फुल आहे. आपल्या अनोख्या दानशूरतेबद्दल महिला सांगते की, गरीबी दूर करण्यास सरकार अपयशी ठरत असल्याचेच मी सिद्ध करते आहे. योग्य रित्या प्रयत्न केले तर देशातील गरीबी दूर करता येऊ शकते, असे ती म्हणाली. या महिलेबाबत काही लोकांचे मत आहे, की माजी चिनी नेता वान ली यांची ती नात असावी. जेव्हा त्यांनी याबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा वान ली यांच्या नातीने आपण ती महिला नसल्याचे स्पष्टपणे सांगितले. मदत करण्यासाठी ही महिला येते तेव्हा लोक तिची ओळख सांगण्याचा हट्ट धरतात, त्यावर ती म्हणते, मला माझी ओळख लपवून ठेवायची आहे. मी हे पब्लिसिटीकरिता करत नाही. मी व्यावसायिक महिला आहे आणि एका श्रीमंत कुटुंबातील आहे. पण मला गरीबांची अवस्था पाहावली जात नाही म्हणून त्यांना मदत करत असते.




# पायांनी सावरले आयुष्य...

## हात नसलेल्या प्रसिद्ध चिनी कलाकाराचा जीवनसंघर्ष

**बीजिंग :** चीनच्या चॉन्गकिंग शहरात राहणाऱ्या हुएंग गुओफो या कलाकाराची जीवनकहानी कुणालाही थक्क करणारी आहे. दोन्ही हात गमावल्यानंतर आयुष्यात सर्व काही संपले आहे, अशी भावना एका क्षणी त्याच्या मनात आली, पण दुसऱ्याच क्षणी पुन्हा नव्या उमेदीने जगण्याची आशाही निर्माण झाली. मग त्याने हातांची जबाबदारी पायांवर सोपवली आणि आयुष्याचा संघर्ष पुन्हा सुरू झाला... पायांनी आणि त्याच्यातील अंगभूत कलाकौशल्यांनी त्याला इतकी साथ दिली की, आजघडीला तो चीनमधील प्रसिद्ध कलाकार झाला आहे. त्याच्या दिमतीला गाडी आहे, नोकरचाकर आहेत, मोठा अलिशान बंगला आहे आणि विशेष म्हणजे त्याला चांगली जीवनसाथीही मिळाली आहे... आयुष्यात काहीच अशक्य नाही, हेच जणून हुएंगने सर्वांना स्वकर्तृत्वातून सांगितले आहे.

हुएंग आता ४१ वर्षांचा झाला आहे. त्याला लहानपणापासूनच कलाकारीची हौस होती. वयाच्या आठव्या वर्षापासून सुरू झालेली त्याची चित्रकारी बाराव्या वर्षी हात गमावल्याने खंडित झाली होती. मग त्याने पायांनी चित्र साकारणे सुरू केले. पायांच्या दोन बोटांत ब्रश पकडून तो चित्र काढतो. कधी कधी तोंडाचाही वापर करतो. विजेचा तीव्र धक्का बसून झालेल्या अपघातात त्याने दोन्ही हात गमावल्याचे सांगण्यात येते. सुरुवातीला जेव्हा त्याने पायांनी चित्र काढण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याला मोठा त्रास सहन करावा लागला. चित्रही व्यवस्थित येत नव्हते. बदलत्या काळात त्याची चित्रकारी सुधारत गेली. हुएंग १८ वर्षांचा असताना त्याचे वडील आजारी पडले. तेव्हा त्यांच्या उपचारासाठी हुएंगला पैशाची गरज भासली. पैशांसाठी त्याने चीनच्या शहरांचा दौरा सुरू केला. प्रत्येक शहरात रस्त्याच्या बाजूला बसून तो अनोख्या पद्धतीने चित्र साकारू लागला आणि विकू लागला. लोक



उत्सुकतेपोटी त्याचे चित्र विकत घेऊ लागले. असाच तो सिचुआन प्रांतातील एका शहरात आला. तेथे त्याची भेट हु गुओइ या तरुणीशी झाली. ती त्याच्या चित्रकारीने इतकी प्रभावित झाली की त्याच्यावर प्रेम करू लागली. हुएंगलाही कुणाचा तरी आधार हवाच होता. मग दोघांनी लग्न केले. लग्नानंतर हुएंगचे आयुष्य खऱ्या अर्थाने बदलले. त्याच्या चित्रांची इतकी चर्चा होत गेली की आजघडीला त्याच्या चित्रांना मोठी मागणी आहे. महागड्या किंमतीला त्याची चित्रे विकली जात आहेत. त्यामुळे रस्त्यावर नग्नपावली फिरताना दिसणारा हुएंग आता अलिशान कारमध्ये दिसत आहे. फुटपाथऐवजी अलिशान बेडरूम त्याच्या नशिबी आली आहे आणि हु गुओइसारखी सुंदर बायकोही जीवन फुलवत आहे...

# केवळ व्यक्ती भिन्न... बाकी सर्व साम्यच...



**रोम :** दोन व्यक्तींच्या आयुष्यात किती साम्य असावेत, यालाही काही मर्यादा आहेत. इटलीचा राजा अंबटरे (प्रथम) आणि एका रेस्टॉरंट मालकाच्या आयुष्यात इतके साम्य होते की अजूनही सर्व जण ते आठवून चकीत होतात. एखाद्याचे आयुष्य काडीमात्र संबंध नसलेल्या दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याशी इतके कसे जुळू शकते, याबद्दल सर्वांनाच आतापर्यंत आश्चर्य वाटत आले आहे. हे साम्य पाहून खुद्द राजाही भारावून गेला होता.

झाले असे होते की, राजा अंबटरे यांना एक दिवस बाहेर जेवण्याची इच्छा झाली. ते एका रेस्टॉरंटमध्ये गेले. साक्षात राजे आपल्या रेस्टॉरंटमध्ये जेवणास आल्याचे पाहून स्वतः रेस्टॉरंटचा मालक त्यांची ऑर्डर घेण्यासाठी गेला. ऑर्डर देताना राजाला त्याच्यात आणि आपल्यात बरेच साम्य आहे, असे निदर्शनास आले. चेहरा, उंचीपर्यंतच हे साम्य मर्यादीत नव्हते तर वागण्या, बोलण्याच्या पद्धतीतही ते दिसून आले. दोघांचे नावही सारखेच होते. त्यामुळे राजाने त्याच्याशी मित्रता केली. त्यानंतर आणखी बरीच आश्चर्यस्पद साम्ये राजाच्या समोर आली. रेस्टॉरंट मालकाचा जन्म ज्या तारखेला झाला होता, त्याच दिवशी २५ मार्च १८४४ रोजी राजाचा जन्म झाला होता आणि तोही एकाच शहरात. जन्मतारिख आणि ठिकाणापर्यंत ठीक होते, पण दोघांच्या पत्नीचेही नाव एकच निघाले. ज्या दिवशी राजाने राज्यकारभार हाती घेतला, त्याच दिवशी रेस्टॉरंट मालकाने आपल्या रेस्टॉरंटचे उद्घाटन केले होते. आपल्यातील एवढे साम्य ऐकून दोघेही चकीत झाले होते. नंतर राजा आणि या रेस्टॉरंट मालकात एवढी गट्टी जमली की त्यांच्या मैत्रीचे किस्से अजूनही लोकांच्या चर्चेत असतात. पण लोक हैराण त्या वेळी झाले जेव्हा त्याचा मृत्यूही एकाच वेळी सारख्याच पद्धतीने झाला. दोघेही एका अपघातात ठार झाले. त्यानंतर समानतेचे एक रहस्यमयी पर्व लोप लावले. पण लोक दोघांच्या समान आयुष्याला विसरलेले नाहीत...

# मेक्सिकोत 120 मीटर रहस्यमयी भुयाराचा शोध

**लंडन :** मेक्सिकोच्या पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्राचीन शहर तियोतिहुआकनखाली १२० मीटर लांब भूयार शोधून काढण्याचा दावा केला आहे. एका रडारच्या साह्याने भुयाराचा शोध लावण्यात आला आहे. भूयार १२० मीटर असला तरी ७ मीटरच आत जाता आले आहे. भुयाराच्या भिंतींवर वेगवेगळ्या प्रकारचे चित्र कोरलेले आहेत. ब्रिटिश वृत्तपत्र डेली मेलमध्ये आलेल्या बातमीत म्हटले आहे, की हे भूयार तीन खोल्यांपर्यंत जातो. भूयार असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर एक छोटासा रिमोट संचालित रोबोट कॅमेऱ्यासह आत पाठविण्यात आला. रोबोट यशस्वीरित्या भुयारात गेल्यानंतर पुरातत्त्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याच्या पाठोपाठ आत प्रवेश केला. भुयारात अनेक खोल्या असून, तेथे मिजोअमेरिकन शासकांचे अवशेष असू शकतात.

# विमान अपघातात स्क्वॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर शहीद

दिल्ली (प्रतिनिधी) – आसामच्या दाट जंगलात बेपत्ता झालेल्या त्या 'सुखोई-३०' विमानाबाबतची भीती अखेर खरी ठरली आहे. तासनतास सुरू असलेल्या शोधमोहिमेनंतर भारतीय वायूसेनेने अत्यंत जड अंतःकरणाने एक दुःखद बातमी दिली. या भीषण दुर्घटनेत भारतीय वायुदलाने हिरा गमावला. स्क्वॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर या दोन तरुण वैमानिकांचा या दुर्घटनेत निधन झाल्याचं स्पष्ट केलं.

गुरुवारी संध्याकाळी सुखोई विमान रडारवरून अचानक गायब झालं आणि संपर्क तुटला, तेव्हा संपूर्ण देश त्यांच्या सुखरूप परतण्यासाठी प्रार्थना करत होता. मात्र, कार्बी आंगलाँगच्या डोंगराळ भागात विमानाचा ढिगारा सापडला. सुखोई ३० विमान डोंगरांमध्ये क्रॅश झाल्याची माहिती समोर आली. स्क्वॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांचंही





निधन झालं आहे. वायूसेनेने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे की, स्क्वॉड्रन लीडर अनुज आणि फ्लाईट लेफ्टनंट पूर्वेश दुरगकर यांना या अपघातात गंभीर दुखापत झाली आणि त्यांचं निधन झालं. भारतीय वायूसेना या वीर जवानांच्या कुटुंबियांच्या दुःखात खंबीरपणे पाठीशी उभी आहे.


गुरुवारी सायंकाळी ७ च्या सुमारास या विमानाने जोरहाट एअरबेसवरून उड्डाण केले होते. त्यानंतर अवघ्या ४० मिनिटांतच, म्हणजे सायंकाळी ७.४२ वाजता विमानाचा रडारशी असलेला संपर्क तुटला. विमान नियोजित वेळेत परत न आल्याने हवाई दलाने तातडीने शोधमोहीम हाती घेतली होती. रात्रभर चाललेल्या या मोहिमेनंतर चोकीहोला परिसरातील जंगलात विमानाचा ढिगारा सापडला.

विमान बेपत्ता झाल्यानंतर हवाई दलाने आणि लष्कराने शोध पथके घटनास्थळी रवाना केली होती. कार्बी आंगलाँगचा हा भाग अत्यंत दुर्गम आणि डोंगराळ असल्याने शोध कार्यात अडचणी येत होत्या. मात्र, विमानाचा शोध लागल्यानंतर दोन्ही वैमानिकांना गंभीर दुखापत झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. हे विमान एका नियमित ट्रेनिंग मिशनवर असताना ही दुर्घटना घडली. विमानाचा रडारशी संपर्क नेमका कोणत्या कारणामुळे तुटला आणि हा अपघात तांत्रिक बिघाडामुळे झाला की अन्य काही कारणामुळे, याचा शोध घेण्यासाठी हवाई दलाने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

# अमेरिका - इस्त्रायल - इराण युद्धाचा भारतीय शेअर बाजारावर प्रतिकूल परिणाम

**अमेरिका (वृत्तसंस्था)** – इस्त्रायलच्या इराणवरील हल्ल्याचा भारतीय शेअर बाजारावर प्रतिकूल परिणाम, सेन्सेक्स २७०० अंकांनी घसरला, निफ्टी २४ हजार ७०० च्या खाली गेला

मुंबई : अमेरिका आणि इस्त्रायल यांनी संयुक्तपणे इराणवर हवाई हल्ले सुरू केले आहेत. या हल्ल्यांना इराणकडून प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न सुरू आहे. लढाईला सुरुवात झाली आहे. या लढाईचा प्रतिकूल परिणाम भारतासह जगभरच्या शेअर बाजारांवर झाला. भारतीय शेअर बाजार आठवड्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजे सोमवार २ मार्च रोजी सकाळी धाडकन कोसळला. सेन्सेक्स २७०० अंकांनी घसरला तर निफ्टी २४ हजार ७०० च्या खाली गेला. निप्टी फिफ्टी हा ५०० पेक्षा जास्त अंकांनी घसरला. सेन्सेक्स २,७४३ अंकांनी घसरून ७८,५४३ वर उघडला, तर निफ्टी फिफ्टी हा ५१९ अंकांनी घसरून



२४,६५९ वर उघडला. या तीव्र घसरणीमुळे बीएसईवर सूचीबद्ध असलेल्या सर्व कंपन्यांच्या एकूण बाजार भांडवलातील ७.८ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम बुडाली.

सेन्सेक्समध्ये इंडिगो, लार्सन अँड टुब्रो (एल अँड टी), इटरनल, अदानी पोर्ट्स आणि एशियन पेंट्स हे सर्वाधिक घसरणीचे शेअर्स होते, जे २ ते ४ टक्के या प्रमाणात घसरले. भारत इलेक्ट्रॉनिक्सचे शेअर्स एक टक्क्यापेक्षा जास्त वाढले. एनएसईवरील क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये निफ्टी रिॲलिटी सर्वाधिक घसरणीचे शेअर्स होते, जे सुमारे २ टक्के घसरले, तर निफ्टी ऑटो, निफ्टी आयटी, निफ्टी पीएसयू बँक, निफ्टी कंझ्युमर ड्युरेबल्स आणि निफ्टी ऑइल अँड गॅस हे प्रत्येकी एक टक्क्यापेक्षा जास्त घसरले.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षेत महाराष्ट्रातील साठाहून अधिक उमेदवार यशस्वी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या नागरी सेवा परीक्षा -२०२५ मध्ये देशातील एकूण ९५८ उमेदवार यशस्वी झाले आहेत. यात राज्यातील ६० हून अधिक उमदेवारांचा समावेश आहे.

केंद्रीय लोकसेवा आयोगाने घेतलेल्या वर्ष २०२५ च्या नागरी सेवा मुख्य परीक्षेचा अंतिम निकाल शुक्रवारी जाहीर झाला. या निकालात पहिल्या १०० उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातील पाच उमेदवारांचा समावेश आहे. ऋषीकेश आलासे ६१ ,आकाश त्रिवेदी यांनी ७३, गौरव चोपडा यांनी ८३, सायली पगार यांनी ८७, वा तर दिक्षा पाटकर यांनी ८८ वा क्रमांक पटकावला आहे.

यशस्वी उमेदवारांची यादी

हृषीकेश आलासे (६१) आकाश त्रिवेदी (७३) गौरव चोप्रा (८३) सायली पगार (८७), दीक्षा पाटकर (८८), ऋतुजा गायकवाड (१०६), वरुण टोकस (११७), अंकिता अनिल पाटील (१४०), आर्यन सिरसीकर (१७५), कार्तिक बच्छाव (१७७), राहुल पाटील (२२४), शुभम शरद बेहेरे (२२६), ऋषिकेश पालिमकर (२८३), मोहिनी जगताप (३२३), अभिषेक ओझार्डे (३३६), हर्षवर्धन पाटील (३४९), हर्षवर्धन तिडके (३५५), कुणाल अहिरराव (४३०), अभिषेक मगदूम (४४९), धनश्री अहिरे (४८९), मनोज पाटील (४९३), विशाखा कदम (५०४), नंदिनी पाटील (५१२), रजत वाळके (५१४), निखिल तांबे (५१७), श्रुती चव्हाण (५२७), धनंजय दिघे (५२९), संकेत कुंभार (५३९), साईराज पाटील (५४५), आरुषा पाटील (५५३), पारस मिस्त्री (५५५), बापूसाहेब गायकवाड (५६१), प्रवीण कोळपे (५८४), अविष्कार डेर्ले (५९१), रोहित माळवेकर (६०१), अभिषेक टेकाडे (६१०), सिद्धार्थ तागड (६१९), भाग्यश्री नायकेले (६४७), शिवम वखारे (६५१), पांडुरंग कांबळी (६६०), अश्विनी कोळेकर (६७५), प्रज्वल नासरे (६७७), अल्पेश ढवळे (६८७), सूरज सूर्यवंशी (७०२), रामेश्वर शिंदे (७०५), बसवराज पाटील (७३९), प्रीतकुमार भाले (७४२), राजश्री देशमुख (७५४), चेतन ठाकरे (७६२), प्रांजली मेश्राम (७६७), मनीष झेंडे (७८८), प्रथमेश शिंदे (८१७), राहुल चांडोलकर (८३१), हेमकृष्ण पिसाडे (८४९), अतुल राजुरकर (८६३), रोहित सांगळे (८६५), सुरेश बोरकर (९१२), प्रेरणा खवले (९१३), अनिकेत अहिरे (९४१)

केंद्र शासनाच्या विविध सेवांमधील रिक्त जागांसाठी ऑगस्ट २०२५ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. डिसेंबर २०२५- फेब्रुवारी २०२६ दरम्यान परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. या परिक्षेच्या निकालातील उत्तीर्ण ९५८ उमेदवारांची केंद्रीय लोकसेवा आयोगाने विविध सेवेतील पदांच्या नियुक्तीसाठी शिफारस केली आहे. यामध्ये सामान्य (ओपन) गटातून ३१७, आर्थिक मागास प्रवर्गातून (ईडब्ल्यूएस) १०४, इतर मागासवर्गीय प्रवर्गातून (ओबीसी) - ३०६, अनुसूचित जाती प्रवर्गातून (एससी) - १५८, अनुसूचित जमाती प्रवर्गातून- ७३ उमेदवारांचा समावेश आहे. लोकसेवा आयोगाने २५८ उमेदवारांची आरक्षित सूची (ठशीशर्ींश डळीीं) तयार केली आहे. यामध्ये सामान्य गट- १२९, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस)- २६, इतर मागास वर्ग -८६, अनुसूचित जाती- ०८, अनुसूचित जमाती - ०६ उमेदवारांचा समावेश आहे. यासोबत एकूण तीन दिव्यांग उमेदवारांचा समावेश आहे.

या रिक्त पदांवर उमेदवार होतील रूजू

भारतीय प्रशासन सेवा (आयएएस) या सेवेत शासनाकडे एकूण -१८० जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (जनरल) ७४, आर्थिक मागास प्रवर्ग (ईडब्ल्यूएस) १८इतर मागास वर्ग (ओबीसी) ४७, अनुसूचित जाती (एससी) २८, अनुसूचित जमाती (एसटी) १३ जागा रिक्त आहेत. उमेदवारांच्या गुणानुक्रमे रिक्त जागांवर यशस्वी उमेदवारांची निवड केली जाईल.

भारतीय विदेश सेवा (आयएफएस) या सेवेत शासनाकडे एकूण ५५ जागा रिक्त आहेत. यामध्ये सामान्य गट (ओपन) २२, आर्थिक मागास प्रवर्ग(ईडब्ल्यूएस) ०६, इतर मागास वर्ग (ओबीसी) १५, अनुसूचित जाती (एससी) ०८, अनुसूचित जमाती (एस.टी.) ०४ जागा रिक्त आहेत.

# कर्नाटकात लहान मुलांना सोशल मीडिया वापरण्यास बंदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – कर्नाटकात मुलांसाठी सोशल मीडियावर बंदी घालण्यात आली आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी विधानसभेत सोशल मीडिया बंदीची घोषणा केली. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की १६ वर्षांखालील मुलांना सोशल मीडिया वापरण्यास मनाई आहे. त्यांनी सांगितले की, १६ वर्षांखालील मुलांवर मोबाईल फोन वापरण्याच्या नकारात्मक परिणामांमुळे ही बंदी घालण्यात आली आहे.

मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालणारे कर्नाटक हे देशातील पहिले राज्य बनले आहे. तथापि, गोवा, महाराष्ट्र आणि बिहार देखील मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर बंदी घालण्याबाबत भागधारकांशी सल्लामसलत करत आहेत.

या राज्यांमध्ये, मुलांसाठी सोशल मीडिया निर्बंध लागू करण्यासाठी सरकारी टास्क फोर्सची स्थापना करण्यात आली आहे.

गेल्या महिन्यात, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या कुलगुरूंशी बोलताना, सोशल मीडिया वापरावरील वय-आधारित निर्बंधांवर चर्चा केली, ऑस्ट्रेलियाचे उदाहरण दिले. सरकारने सोशल मीडिया बंदीसाठी आंतरराष्ट्रीय मॉडेल्सचा अभ्यास करण्याचा निर्णय घेतला.

त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की इस्रो आणि केओनिक्सच्या सहकार्याने आयआयएससी अंतर्गत बेंगळुरू रोबोटिक्स आणि एआय इनोव्हेशन झोन नावाचा रोबोटिक्स आणि एआय कॅम्पस स्थापन केला जाईल. त्यांनी स्पष्ट केले की सोशल मीडियाच्या नकारात्मक परिणामांमुळे आणि १६ वर्षांखालील मुलांवर मोबाईल फोनचा वाढता वापर यामुळे हा कठोर निर्णय घेण्यात आला आहे.

# अजितदादांच्या विमान अपघातानंतर बारामती विमानतळाबाबत घोषणा; देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्पातून सांगितलं!

मुंबई (प्रतिनिधी) - राज्याचे मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज (६ मार्च) महाराष्ट्राचा अर्थसंकल्प (२०२६) सादर केला. महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्प सादर केला. विशेष म्हणजे अजित पवारांनी अर्थसंकल्पाची बहुतांश तयारी केलेली होती. मात्र अजित पवारांच्या अपघाती मृत्यूनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प मांडला.

आजचा अर्थसंकल्प २०४७ च्या विकासाकडे जाणारा आहे. महात्मा फुले यांच्या जन्माला २०० वर्षे पुर्ण होत आहे. यासाठी एक समिती स्थापन करुन विविध कार्यक्रम आयोजन करण्यासाठी निधी दिला जाईल. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शताब्दी वर्षा निमित्त रायगड येथे पायाभूत सुविधा केल्या जातील. सामाजीक समरसता वर्ष म्हणुन साजरा केला जाईल. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाच काम पुर्ण झालं आहे. तर राज्यात काही योजना सुरु केल्या जातील, अशी मोठी घोषणा देवेंद्र फडणवीसांनी केली.

राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. बारामती विमानतळावर लँड होत असताना विमान कोसळलं आणि अजित पवारांसह पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. यानंतर चौकशी अहवालात बारामती विमानतळाबाबत विविध त्रुटी आढळून आल्या होत्या. याच बारामती विमानतळासह लातूर आणि अमरावती विमानतळासाठी देवेंद्र फडणवीसांनी अर्थसंकल्पात मोठी घोषणा केली आहे. लातूर, बारामती आणि अमरावती विमानतळावर रात्रीच्या उड्डाणांसाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. २५-१२-२५ पासून नवी मुंबई विमानतळावरुन देशांतर्गत उड्डाणांना सुरुवात, पुरंदर-पुणे विमानतळासाठी विशेष प्राधिकरण, भूसंपादन अंतिम टप्प्यात, गडचिरोली विमानतळासाठी भूसंपादन, लातूर, बारामती आणि अमरावती विमानतळावर रात्रीच्या उड्डाणांसाठी सुविधा शिर्डी, नाशिका, संभाजीनगर, अमरावती, अकोला, रत्नागिरी, यवतमाळ, कराड विमान विस्तारीकरण माझं अंतःकरण जड झालं आहे. अजितदादा यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडला. त्यांच्या करडी स्वभावामुळे शिस्त राहिली. त्यांना श्रद्धांजली म्हणुन त्यांच भव्य स्मारक उभारलं जाईल. नागरी पुरस्कार त्यांच्या नावाने सुरु केला जाईल.हा अर्थसंकल्प त्याना सादर करतो, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# खाद्य पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या रंगांमधील घातक घटकांच्या नियंत्रणासाठी धोरण ठरविणार- झिरवाळ

**मुंबई (प्रतिनिधी)** – विक्री होणाऱ्या खाद्य पदार्थांमध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध रंगांमध्ये असलेल्या घातक घटकांबाबत चर्चा करुन खाद्यरंगांबाबतचे धोरण ठरविण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात येईल. या बैठकीस विधानसभेतील या क्षेत्रातील जाणकार सदस्यांना निमंत्रित केले जाईल. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या कायद्यांमध्ये आवश्यक बदल करण्यासंदर्भात प्रधानमंत्री मोदी यांना विनंती करण्यात येईल, असे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य महेश शिंदे यांनी खाद्यपदार्थांमध्ये रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार केले जाणारे घातक कृत्रिम रंग वापरले जात असल्याबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली.

## टी.सी. हरवली

माझी नजमुस्सहेर अनिस अहमद फारूकी या नावाची १२ वी विज्ञान शाखा पास टि.सी.व कागदपत्रे सिडको ते जुना मोढा नांदेड दुचाकीवरून प्रवास दरम्यान हरवली आहे,कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क साधावा.

मोबाईल नंबर.९४२२८७२७०३

## जाहीर प्रगटन

माझे अशिल नामे लक्ष्मिबाई भ्र. मोहनराव सातव, मोहन पि. नारायण सातव व दिपाली पि. मोहनराव सातव यांनी दिलेल्या माहिती व अधिकारान्वये सर्व जनतेस व संबंधितांना माहितीस्तव या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की संतोष पि. मोहनराव सातव राहणार हिमायतनगर, ता. हिमायतनगर जि. नांदेड यांच्या नावे असलेली मौजे पिछोंडी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड स्थितः शेत गट क्रमांक ६५ मधील ०१ हेक्टर ८३ गुंठे ज्याची चतुः सिमा पुर्वेस- बाबाराव बनसोडे यांचे शेत, पश्चिमेस विक्रीखत करून घेणाऱ्याची शेत जमिन शेत जमिनः दक्षिणेस श्रीराम झळके यांची शेत जमिन आणि उत्तरेस - उत्तम बनसोडे यांची शेत जमिन आहे. सदरची चतुः सिमेमधील शेत जमिन ही संतोष मोहनराव सातव यांच्या स्व-कमाईतून विकत घेतलेली नसून माझ्या अशिलांचा सुद्धा हक्क अबाधित आहेत. सदरील वर्णनाची शेत जमिन ही संतोष मोहनराव सातव हे त्यांच्या नावावर नोंदणीकृत विक्रीखत तसेच सातबारा उताऱ्यात नावे असल्याचा गैरफायदा घेत विक्रीखत, सौदाचिठ्ठी, गहाणखत, बक्षिसपत्र, अथवा दानपत्र करण्याच्या तयारीत आहेत. सदरच्या शेत जमिनीमध्ये हक्क असल्यामुळे माझे अशिल हे मान्यवर दिवाणी न्यायालय, हिमायतनगर येथे दिवाणी दावा दाखल करणार आहेत, तरी या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, संतोष मोहनराव सातव यांच्या नावे असलेली मौजे पिछोंडी, ता. हिमायतनगर, जि. नांदेड स्थितः शेत गट क्रमांक ६५ मधील ०१ हेक्टर ८३ गुंठे ज्याची चतुः सिमा पुर्वेस- बाबाराव बनसोडे यांचे शेत, पश्चिमेस विक्रीखत करून घेणाऱ्याची शेत जमिन शेत जमिन; दक्षिणेस श्रीराम झळके यांची शेत जमिन आणि उत्तरेस उत्तम बनसोडे यांची शेत जमिन असलेल्या चतुः सिमेमधील शेत जमिनीबद्दल कोणतेही विक्रीखत, सौदाचिठ्ठी, गहाणखत, बक्षिसपत्र, अथवा दानपत्र करून घेतल्यास माझ्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही व झालेल्या व्यवहाराची सर्वस्वी जबाबदारी ही देणार व घेणार ह्यांच्यावर राहील याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी करिता हे जाहीर प्रगटन, प्रसिद्ध करीत आहोत.

स्थळ :- हिमायतनगर,
दिनांक :- ०६/०३/२०२६.

जाहीर प्रगटन देणार.
अॅड.सुनिल देवराव शिंदे
विधीज्ञ हिमायतनगर

जे- / / 576 /२०26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड
दिनांक – 05/03/2026

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक 195/२०26 कलम १९
सार्वजनिक न्यासाचे नांव : [illegible]
अर्जदार नांव : [illegible]

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल् अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यासा अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्यां मालकीचा आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये 2,002/- जमा आहेत.
ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक05/03/2026रोजी दिली.

(श्रीराम बि. एन)
वरिष्ठ लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग नांदेड

(श्रीमती पिं. ज. रॉय)
(आधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

१. दैनिक पेपर प्रसिध्दी करीता
२. कार्यालयीन नोटीस बोर्डावर

## मार्कमेमो हरवले

माझा किरण शंकर पठाडे या नावाचा महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनचा डिप्लोमा इन सिव्हील इंजिनिअरींचा द्वितीय वर्षाचा मार्कमेमो फुले मार्केट ते काब्दे हॉस्पीटल दरम्यान ऑटो प्रवासात हरवला आहे. ज्यांना कोणाला सापडला असेल त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता–किरण शंकर पठाडे, डॉ. आंबेडकरनगर, नांदेड मो. ९४२२८७०६०१**

## हरवली आहे

मी नामदेव गोविंदराव धोपटे रा. नांदेड दि. २७/०२/२०२६ रोजी नांदेड ते कंधार बस प्रवास करीत असताना दि. १६ ऑगस्ट २०१७ रोजी केलेली शेतीची सौदाचिठ्ठी हरवली आहे. तरी कोणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावा. सौदाचिठ्ठी आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

**-: संपर्क पत्ता :-**
**नामदेव गोविंदराव धोपटे**
**रा. सिद्धनाथपुरी, नांदेड मो.नं. ८०१००२६०३९**

जे- / / 577 /२०26
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग, नांदेड
दिनांक – 05/03/2026

चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक 150/२०26 कलम १९
सार्वजनिक न्यासाचे नांव : [illegible]
अर्जदार नांव : [illegible]

सर्व संबधित लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड, विभाग नांदेड हे वर नमुद केलेल्या अहवाल् अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१. वर नमुद केलेला सार्वजनिक न्यासा अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय?
२. खालील निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्यां मालकीचा आहे काय?
अ) जंगम मिळकत (वर्णन) : अर्जदार यांच्या कडे सभासद फी रुपये 3,007/- जमा आहेत.
ब) सदर मिळकत (वर्णन) :

सदरच्या चौकशी प्रकरणामधे कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देण्याचा असेल त्यांनी त्याची लेखी कैफियत हि नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखे पासून तीस दिवसाच्या आत या कार्यालयाच्या पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास कांही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाच्या निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जाईल.

ही नोटीस माझ्या सहिनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड याचे शिक्यानिशी आज दिनांक05/03/2026रोजी दिली.

(श्रीराम बि. एन)
वरिष्ठ लिपिक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

सहाय्यक धर्मादाय आयुक्त नांदेड विभाग नांदेड

(श्रीमती पिं. ज. रॉय)
(आधिक्षक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नांदेड विभाग नांदेड

१. दैनिक पेपर प्रसिध्दी करीता
२. कार्यालयीन नोटीस बोर्डावर


**4000 x 4 =16000 इस्क्वायर फूट**

**4 मजली हॉस्पिटल, लॉजिंग, बोर्डिंग, ऑफिस, यासाठी किरायाने देणे आहे**

9763226190
7972231307

पत्ता : कामठा बायपास गट नं. 2015 प्लॉटनं. 2 गुरूकृपा कॉम्प्लेक्स, शंकरराव चव्हाण चौक, नांदेड-431605


## Change In Name

My Old Name is **Ujjawala Pandhari Jambad** which now I am changing as New Name **Ujjawala Govindrao Warwantkar.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - At.Po. Bori (Bk.) Tq. Kandhar Dist. Nanded 431714**


## Change In Name

My Old Name is **Jivanrao Govande** which now I am changing as New Name **Jivan Nogorao Govande.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - D/o. Jivan Govande, Plot No. 37, Raj Nagar, Nanded, Shivaji Nagar, Maharashtra 431602**


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# महिलांच्या खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन

## जागतिक महिला दिनानिमित्त कोरो इंडिया व विविध सामाजिक संस्था, एकल महिला संघटनेचा पुढाकार

**नांदेड (प्रतिनिधी)** – कोरो इंडिया व विविध सामाजिक संस्था, एकल महिला संघटनेच्या पुढाकारातून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने सिडको येथील इंदिरा गांधी महाविद्यालय ग्राऊंडवर शनिवार, दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार आहे.

८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त मराठवाडा विभागस्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. लैंगिक समानतेचा संदेश गावोगावी पोहोचला जावा, महिला नेतृत्व पुढे येण्याची संधी मिळावी, लैंगिक अत्याचार विरोधी जनजागृतीसाठी स्पर्धेच्या ठिकाणी समुपदेशन केंद्र उभारण्यात आले आहे. शरीराविषयीची लाज आणि संकोच कमी झाला पाहिजे. आत्मविश्वास, नेतृत्व आणि एकजूट वाढली पाहिजे, महिलांच्या कार्याला, विचारांना प्रोत्साहन देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध लेखिका, प्रा. डॉ. विजयाताई दाढेल यांची उपस्थिती राहणार आहे तर उद्घाटन म्हणून तृतीय पंथीय समुदायाच्या श्रीमती मन्नत संग्राम तेलंगे यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेत्री डॉ. अनुराधाताई पत्की, सहायक पोलीस निरीक्षक सौ. रेखाताई काळे, प्रा. वैशालीताई सावंत यांची उपस्थिती राहणार आहे. कबड्डी सामने संपल्यानंतर लगेच बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार असून, बक्षीस वितरण समारंभ वाघाळा शहर महानगरपालिकेच्या महापौर सौ. कविता मुळे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या नवनियुक्त नगरसेविका सौ. सुवर्णा सतीश पा. बस्वदे, सौ. निरंजना राजू लांडगे, श्रीमती मंगलाताई गजानन देशमुख, सौ. सरिताताई उमेशराव पवळे, डॉ. मंजुषा प्रसाद रानवळकर, माजी नगरसेविका सौ. बेबीताई गुपिले, सौ. ललिताताई शिंदे- बोकारे यांची उपस्थिती राहणार आहे. तर तृतीयपंथीय समुदायातील अमोल डोईजडे, चंद्रकला देवकर, जयंद्र सोमवंशी, भिमाशंकर कांबळे यांचीही उपस्थिती राहणार आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावऱ्या संघाला ५००० रुपये, सन्मान चिन्ह आणि प्रमाणपत्र मेडल दिले जाणार आहे तर दुसरा क्रमांक ३००० रुपये, तिसरा क्रमांकास २००० रुपये, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी रयत सेवाभावी संस्था सुजलेगांव, वंचित विकास लोक संस्था, नांदेड, भारतीय भटक्या विमुक्त जमाती विकास संघटना नांदेड. महिला जागृत संस्था परभणी, जनजागृती बहुउद्देशीय जिजामाता सेवाभावी संस्था, अहमदपूर जि. लातूर, संकल्प सेवाभावी संस्था, वायेगाव ता. अहमदपूर जि.लातूर, लोक विकास केंद्र, पाथरी जि. परभणी, छत्रपती शाहु समता प्रतिष्ठान पूर्णा, जि. परभणी, अभिजीत बहुउद्देशी सेवाभावी संस्था हिंगोली, जन विकास मंडळ, बाऱ्हाळी, रूढीग्रस्त लोकवंचित कलावंत परिषद, परभणी, सर्वांगीण मानव विकास संस्था, रूमणा ता. गंगाखेड यांचा सहभाग राहणार आहे, अशी माहिती रयत सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. इरवंत समर्यकार यांनी दिली आहे.

# अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना २ लाख रुपये कर्जमाफी; अर्धापुरात निर्णयाचे स्वागत



**अर्धापूर (प्रतिनिधी)** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत राज्याचा अर्थसंकल्प मांडताना शेतकऱ्यांचे २ लाख रुपये कर्ज माफ केले. यामुळे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली फटाके फोडून, पेढे वाटून पू. अहिल्याबाई होळकर चौक अर्धापूर येथे जल्लोष करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने शेतकऱ्यांना दोन लाख रुपये कर्ज माफ तसेच शेतमजुरांचा विमा काढण्याची घोषणा केली. तसेच विविध योजनांना मंजुरी देत विकसित महाराष्ट्र करण्याचा अर्थसंकल्प मांडल्यामुळे भाजपचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली फटाके फोडून, पेढे वाटून घोषणाबाजी करत जल्लोष करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख, उपसभापती तातेराव वाकोडे, माजी सरपंच अशोक बुटले, माजी सभापती व्यंकटराव साखरे, प्रदेश चिटणीस रामराव भालेराव, सचिव पंडितराव लंगडे, युवानेते विराज देशमुख, अभिषेक गुरखेल, माजी तालुकाध्यक्ष जठन मुळे, चांदबाजी कानोडे, उमाकांत सरोदे, किशोर शहाने, आनंद वैद्य, बाळू माटे, माजी नगरसेवक शिवराज जाधव, संतोष पवार, राजू गायकवाड, बाबुराव जाधव, बाबाराव सरोदे, परमेश्वर लालमे, महेश भोसले, विठ्ठल वानखेडे, कैलास भुस्से, संजय डुबे, आकाश साखरे, संदीप बंडाळे यांच्यासह भाजप पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिथीप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



**नांदेड (प्रतिनिधी)** –हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती तिथीनुसार चौफाळा येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नियोजित अर्धाकृती पुतळ्यास दुग्धाभिषेक करण्यात आला.

यावेळी नांदेडचे शिवसेना उपजिल्हा संघटक गजानन हारकरे, श्रीराम सुनकेवार, मनीष झगडे, मस्तान मिस्तरी, संतोष वाघमारे, उत्तमराव सूर्यवंशी, गोविंद गरुडकर, धमपलवार सावकार, सदाशिव उरंडे, विठ्ठल पाटील उघडे, अशोक वाघमारे, साहेबराव जोंधळे, अभय हसनपल्ली यांच्यासह शिवसैनिक व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**नांदेड** – शिवक्रांती बहुजन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष गव्हाणे पाटील व प्रदेशाध्यक्ष प्रशांत मुळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय छावा प्रदेशाध्यक्ष पंजाबराव काळे, युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश पाटील शिंदे, शिवसेना तालुका प्रमुख सुनिल पाटील कदम, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष स्वप्नील पाटील कदम आदी उपस्थित आहेत. **(छाया : करणसिंह बैस)**



**नांदेड** – सदाबहार फाउंडेशन नांदेडच्यावतीने जीवन गौरव पुरस्कार व कार्यकर्ते गौरव पुरस्कार वितरण सोहळा माजी आ. पंडिराव देशमुख यांच्या हस्ते पार पडला. यावेळी माजी खा. डॉ. व्यंकटेश काब्दे व त्यांच्या सुविद्य पत्नी कुंजम्मा काब्दे, विजय सोनवणे व निशा सोनवणे, प्रा. अशोक सिद्धेवाड व शोभा सिद्धेवाड यांना शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सदाबहार फाउडेशनचे संस्थापक डॉ. प्रवीण पाटील हे दिसत आहेत.

**(छाया : नरेंद्र गडप्पा, नांदेड)**

# विभागीय रेल्वे रुग्णालयात यशस्वी लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया पित्ताशयातून सुमारे ८५ खडे काढण्यात डॉक्टरांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)** –दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागातील वैद्यकीय विभागाने ५ मार्च रोजी विभागीय रेल्वे रुग्णालय नांदेड येथे लॅप्रोस्कोपिक कोलेसिस्टेक्टॉमी शस्त्रक्रिया पार पाडली. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णालयाची गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया कार्यक्षमतेने आणि काळजीपूर्वक हाताळण्याची क्षमता पुन्हा अधोरेखित झाली आहे.

रेल्वे संरक्षण दलामधील ५० वर्षीय कर्मचाऱ्याला पित्ताशयात अनेक खडे (गॉल ब्लॅडर कॅल्क्युलाई) तसेच एपिगॅस्ट्रिक हर्निया असल्याचे निदान झाले होते. त्यामुळे दोन टप्प्यांत शस्त्रक्रिया करण्याचे नियोजन करण्यात आले. पहिल्या टप्प्यात लॅप्रोस्कोपिक पद्धतीने पित्ताशय काढण्यात आला असून, पुढील टप्प्यात हर्नियासाठी मेष रिपेअर शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. रुग्ण लठ्ठ असल्यामुळे शस्त्रक्रियेपूर्वी वैद्यकीय पथकाने सखोल तपासणी करून सुरक्षित शस्त्रक्रिया व्यवस्थापनाची तयारी केली. शस्त्रक्रियेच्या वेळी भूल देताना ॲनेस्थेशिया विभागास श्वासनलिका सुरक्षित करण्यामध्ये अपेक्षित आव्हाने होती. तसेच शस्त्रक्रियेच्या प्रक्रियेत शल्यचिकित्सकांनाही काही तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र तज्ज्ञता आणि समन्वयाच्या बळावर वैद्यकीय पथकाने सर्व आव्हाने यशस्वीपणे हाताळली.

शस्त्रक्रियेदरम्यान डॉक्टरांना पित्ताशयामध्ये अपेक्षेपेक्षा खूप मोठ्या प्रमाणात खडे आढळले. पित्ताशयातून सुमारे ८५ खडे यशस्वीरित्या काढण्यात आले. ही शस्त्रक्रिया डॉ. बी. श्रीनिवास नाईक, वरिष्ठ विभागीय वैद्यकीय अधिकारी (ॲनेस्थेसियोलॉजी), नांदेड आणि डॉ. अमोल चौव्हरे, सल्लागार जनरल सर्जन (केस-टू-केस आधारावर) यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली पार पडली. सध्या रुग्णाची प्रकृती स्थिर असून, तो विभागीय रेल्वे रुग्णालय, नांदेड येथे शस्त्रक्रियेनंतरच्या निरीक्षणाखाली चांगल्या प्रकारे बरा होत आहे. ही यशस्वी शस्त्रक्रिया दक्षिण मध्य रेल्वेच्या वैद्यकीय विभागाची समर्पित सेवा, कौशल्य आणि तयारी दर्शविते तसेच रेल्वे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना दर्जेदार आरोग्य सेवा देण्याच्या वचनबद्धतेची पुन:प्रचिती देते.

# शांताबाई गंदेवार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)** – शहरातील शिवाजीनगर भागातील रहिवासी, ज्येष्ठ महिला शांताबाई सूर्यकांत गंदेवार यांचे शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी पहाटे निधन झाले. त्या ८० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात मुले सीए श्यामसुंदर व साईनाथ, सुना, ४ मुली, जावई, नातवंडे, पणतू असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि. ६ रोजी दुपारी ३ वाजता राहत्या घरुन निघाली आणि शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# कलंबर येथील श्री मारुती मंदिर देवस्थान ट्रस्टची फसवणूक; मुक्रमाबाद ठाण्यात गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)** – मुखेड तालुक्यातील कलंबर देवाचे येथे ग्रामसेवकाला हाताशी धरून बनावट प्रमाणपत्र तयार करून ते खरे आहे असे दाखवून श्री मारुती मंदिर देवस्थान ट्रस्टची बॉडी तयार करून गावकऱ्यांची व शासनाची फसवणूक करण्यात आली. हा प्रकार सात मार्च २०२४ ते एक एप्रिल २०२४ दरम्यान घडला.

मुखेड तालुक्यातील कलंबर देवाचे येथे राहणारे गोविंद माधवराव शिंदे, बबन गोविंदराव शिंदे, अर्चना बबन शिंदे, अशोक शिवराज स्वामी, सुनिता पांडुरंग शिंदे आणि ग्रामसेवक एम. एम. मनियार यांनी संगनमत करून संजय मोतीराम कलंबरकर यांच्या वडिलांची ग्रामपंचायत कार्यालय कलंबर येथे मृत्यूची नोंद नसताना अप्रमाणिकपणे बनावटी खोटे मृत्यू प्रमाणपत्र तयार करून खोटा दस्तावेज तयार केला आणि तो खरा आहे म्हणून वापरून सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्याकडे खोटे दस्तावेज देऊन श्री मारुती मंदिर देवस्थान ट्रस्ट कलंबर बॉडीमध्ये रक्ताच्या नातेवाईकांचा समावेश करून फसवणूक केली. विशेष म्हणजे गावातील लोकांना विश्वासात न घेता ही बॉडी तयार करून गावकऱ्यांची आणि शासनाचीही फसवणूक केली. या प्रकरणी संजय मारोतराव कलंबरकर यांच्या फिर्यादीवरून सहा जणांविरुद्ध मुक्रमाबाद पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भोकर येथे लाईनमनला मारहाण; थकबाकीदार वीज ग्राहकावर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– थकबाकी वसूल करण्यासाठी गेलेल्या एका महावितरणच्या कर्मचाऱ्यास थकबाकीदार वीज ग्राहकाने मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. ही घटना ५ मार्च रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास भोसी येथे घडली.

भोकर तालुक्यातील भोसी येथील राहणारा अश्वजीत भीमराव तारू व त्याच्या शेजारी राहणारे काही अन्य घरगुती वीज ग्राहक यांच्याकडे महावितरणचे वीज बील मागील काही दिवसांपासून थकीत होते. ही थकबाकी वसूल आणि वीज पुरवठा खंडित करण्यासाठी भोकर महावितरणचे कर्मचारी गणेश भरत राजरपल्ले व त्यांचे साथीदार ५ मार्च रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास भोसी गावात पोहोचले. थकबाकी असलेले वीज बील भरा किंवा आम्ही कारवाई करू, असे म्हणताच वीज पुरवठा खंडित करण्याचा प्रयत्न केला. यावेळी माझा वीज पुरवठा खंडित का केला म्हणून लाईनमन असलेला गणेश राजरपल्ले यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ केली आणि शासकीय कामात अडथळा निर्माण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे. थकबाकीदार वीज ग्राहकांचा आक्रमक पवित्रा लक्षात घेता महावितरणचे सर्व कर्मचारी वसुली न करता फिरले. घडलेला प्रकार वरिष्ठांना सांगून त्यांनी भोकर पोलीस ठाणे गाठले. गणेश राजरपल्ले यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलीस ठाण्यात अश्वजीत तारू विरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलीस उपमहानिरीक्षक यांच्या पथकाचे लातूरमध्ये छापे; गुटखा व मटका कारवाईत हजारोंचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या पथकाने लातूरमध्ये छापे मारले. गुटखा व मटका कारवाईत ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी लातूर जिल्ह्यात पोलीस पथक रवाना केले होते. या पथकाने, गुरुवार, दि. ५ मार्च रोजी पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील करीमनगर येथील एका घरामध्ये छापा टाकला. या छाप्यात अवैधरित्या विक्री करण्यासाठी साठवून ठेवलेला ६९ हजार ४८५ रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी इम्रान इसाक पठाण (वय २८, रा. करीमनगर, लातूर) याच्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गुरनं १४५/२०२६ कलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथील सपोनि वसंत मुळे हे तपास करीत आहेत.

सदर प्रकरणात आरोपीकडून जप्त केलेला गुटखा त्याने विक्रीसाठी कोठून आणला होता, तसेच कोणत्या मार्गाने व कोणत्या वाहनांद्वारे त्याची वाहतूक करण्यात आली व शहरामध्ये त्याचा कोणकोणत्या ठिकाणी पुरवठा करण्यात येतो, याबाबत सखोल तपास सुरू आहे. यामध्ये पुरवठा साखळी उघड करण्याच्या दृष्टीने पडताळणी करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पथकाने, लातूर शहरातील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत आमलेश्वर नगरात रेल्वे लाईनच्या बाजूला शिवराज चनप्पा शेटे कॉम्लेक्समध्ये मटका बुक्कीवर कारवाई करत, ११ हजार ६२० रुपयांची रोकड व १० हजार रुपयांचा एक मोबाईल असा एकूण २१ हजार ६९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणात एकूण (१३) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांच्या विरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १०२/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. या गुन्ह्याचा तपास एम.आय. डी.सी. पोलीस ठाण्यातील हवालदार दामोदर मुळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही कारवायांत विशेष पथकाने ६९ हजार ४८५ रुपयांचा गुटखा, २१ हजार ६९० रुपये नगदी व मोबाईल असा एकूण ९१ हजार १७५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा ९१ ५० १०० १०० या 'खबर' हेल्पलाईनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# दरोड्याच्या गुन्ह्यातील सहा जणांना अटक; तीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोडा टाकणाऱ्या टोळीला पोलिसांनी जेरबंद केले. एवढेच नाही तर त्यांच्याकडून तीन लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी करण्यात आली. विशेष म्हणजे यातील एक आरोपी हा याच भागात एका ठिकाणी वॉचमन म्हणून काम करत होता.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाहिजे व फरारी आरोपींना पकडण्यासाठी गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक महेश माळी, पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख व त्यांचे सहकारी यांनी गस्त सुरू केली. पोलीस निरीक्षक संतोष तांबे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने यांच्या आदेशावरून हे पथक गस्त घालत असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. यावरून पथकाने भाग्यनगर ठाण्यात दाखल असलेल्या गुरन ११९/२०२६ कलम ३१० (२), ११५ (२), ३१७ (३) प्रमाणे गुन्ह्यातील आरोपींचा मागोवा घेतला. यावेळी दरोडा टाकणाऱ्यातील एक जण तुलसी पार्क पावडेवाडी येथे वॉचमन म्हणून काम करतो. त्याने व त्याच्या मित्रांनी मिळून दरोडा टाकला असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन सदरची कारवाई करण्यात आली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com